रायगड, मंगळवार, दि. १६ जुलै २०२४

कृषीवल

किंमत ४ ₹

मुख्यमंत्र्यांवर विश्वास नाही : हाके

मुंबई : आम्ही आंदोलन मागे घ्यावं म्हणून सरकारकडून, मुख्यमंत्र्यांकडून आम्हाला आश्वासनं देण्यात आली. मात्र, यातील एकही आश्वासन पाळण्यात आल्याचं दिसत नाही, असं ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके म्हणाले. आत्ताच्या मुख्यमंत्र्यांवर आम्हाला एक टक्क्याचाही विश्वास नाही. कारण शासनाच्या संरक्षणात कुणब्यांच्या सर्टिफिकेटद्वारे ओबीसी आरक्षण संपवण्याचा घाट या मुख्यमंत्र्यांनी घातलेला आहे. आमच्या व्हीजेएनटीच्या माणसाला सर्टिफिकेट काढण्यासाठी दोन-तीन महिने जातात. पण शासन टेबल लावून सर्टिफिकेट कसं देऊ शकतं, असा सवाल हाकेंनी केला आहे.

भाजपचे हर्षवर्धन पाटील वादात

सांगली : भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील वादात सापडले आहेत. हर्षवर्धन पाटील यांनी कोल्हापूरच्या इचलकरंजी लोकसभा मतदारसंघाची तुलना थेट पाकव्याप्त काश्मीरसोबत केली आहे. धैर्यशील माने यांनी पाकव्याप्त काश्मीरसारख्या इचलकरंजीमधून विजयाचा दिवा लावला, असं वादग्रस्त विधान हर्षवर्धन पाटील यांनी सांगलीच्या वाळवामध्ये केलं आहे. क्रांतीवीर नागनाथ अण्णा नायकवाडी यांच्या जयंती समारंभामध्ये हर्षवर्धन पाटील बोलत होते. हर्षवर्धन पाटील यांच्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे.

आजचा अग्रलेख

चिखलातली मस्ती

शेकडो टन धान्य पाण्यात

- भारतीय खाद्य निगमच्या गोदामात पुराचे पाणी
- भिजलेले धान्य सडण्याची भीती
- अहवाल तयार करण्याचं काम सुरु

संग्रहित छायाचित्र

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कळंबोली येथील भारतीय खाद्य निगमच्या गोदमात ठेवलेले शेकडो टन धान्य ७ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे भिजले आहे. दरवर्षी पावसाचे पाणी गोदामात जाऊन धान्याची नासाडी होत असतानाही अद्याप कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे भिजलेले धान्य सडण्याची भीती आहे. दरम्यान, पावसामुळे किती टन धान्य भिजले याचा अहवाल तयार करण्याचं काम सुरु असल्याची माहिती एफसीआयच्या अधिकाऱ्यांनी दिली.

35 फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची गोदामे

3,500 टन धान्य साठवणूक क्षमता (5)

5000 टन धान्य साठवणूक क्षमता (30)

यापूर्वी आगीच्या भक्ष्यस्थानी गोदाम

खाद्य निगमच्या गोदमाला आग लागून धान्याचे नुकसान झाल्याच्या घटनादेखील यापूर्वी घडल्या आहेत. २०२३ मध्येदेखील शॉर्टसर्किटमुळे ३ क्रमांकाच्या गोदामातील धान्य जळून खाक झाले होते. तर, ऑक्टोबर २०२२ मध्ये लागलेल्या आगीत तांदळाची ५० किलो वजनाची २३ हजार सहाशे ८६ पोती खाक झाली होती.

> भिजलेल्या धान्यामुळे झालेल्या नुकसानीचा अहवाल तयार करण्यासाठी कर्मचाऱ्यांचे पथक तयार करण्यात आहे. तपासणीनंतर झालेल्या नुकसानीची माहिती मिळणार आहे.
>
> – विलास दरेकर, एफसीआयचे अधिकारी

अधिकाऱ्यांची सारवासारव

भिजून खराब झालेल्या धान्याची कशा प्रकारे विल्हेवाट लावली जाते. याबाबत एफसीआयच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नाही. भिजलेले धान्य बिस्किट कंपन्या, मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना विकल्याची चर्चा असून, यातून मोठी आर्थिक उलाढाल झाल्याचे बोलले जात आहे.

दरवर्षी नुकसान

दरवर्षी पावसाळ्यात गोदाम परिसरात पाणी साचून शेकडो टन धान्याची नासाडी होण्याची घटना घडते. ही नासाडी रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आली पाहिजे, असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

कळंबोली लोखंड आणि पोलाद बाजार परिसरात फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे ३ हजार ५०० टन धान्य साठवणूक करण्याची क्षमता असलेली पाच, ५ हजार टन धान्य साठवणूक करण्याची क्षमता असलेली १५ तसेच ५ हजार टन धान्य साठवणूक करण्याची क्षमता असलेली १५ अशी ३५ गोदामे आहेत. या ठिकाणी हजारो टन धान्याची साठवणूक करण्यात येते. साठवण्यात आलेले धान्य महाराष्ट्रातील विविध भागातील शिधावाटप केंद्रांना पुरवले जात असते. रविवारी ७ जुलै रोजी पनवेल तसेच परिसराला पान ५ वर

कार्लेखिंडीत एसटीचा भीषण अपघात

सुदैवाने प्रवासी बचावले

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग-पेण मार्गावरील कार्लेखिंड येथे वळणावर एसटी बस कलंडली. सोमवारी (दि. १५) सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास ही घटना घडली. गाडीचा एक्सल तुटल्याने चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने हा अपघात झाला. यामध्ये तीन जणांना किरकोळ दुखापत झाली. रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाचा आधार मिळाल्याने एसटीतील प्रवाशांचा जीव बचावला.

नेहमीप्रमाणे अलिबाग आगारातूनसकाळीआठवाजण्याच्या सुमारास पनवेलकडे बस निघाली. कार्लेखिंड येथे उतारावर आल्यावर गाडीवरील ब्रेक पान ५ वर

> कार्लेखिंड येथील एसटी बस अपघातामध्ये ब्रेक फेल होण्याबरोबरच एक्सल तुटला. त्यामुळे चालकाचा ताबा सुटला होता. रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडाचा आधार गाडीला मिळाल्याने मोठी दुर्घटना टळली. सुरक्षेच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष देऊन योग्य ती उपाययोजना करावी याबाबत पत्र दिले जाणार आहे.
>
> – संतोष दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोयनाड

वे|धा|क

डोणवत धरणात तरुण बुडाला

वावोशी : खालापूर तालुक्यात छत्तिशी विभागातील डोणवत धरणात एका २६ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना दि. १४ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. तीन दिवसांपासून सतत पडत असलेल्या अतिवृष्टीने डोणवत धरण तुडुंब भरले असून, या ठिकाणी हा व्यक्ती पोहण्यासाठी आला होता. परंतु, त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. उमेश चव्हाण असे मृत तरुणाचे नाव असून, तो मूळचा उत्तर प्रदेश येथील रहिवासी आहे. तो कामानिमित्त येथे राहात होता. ही घटना समजताच वावोशी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार निलेश सोनवणे, गिरीश नगरकर, विकास शिंदे, अपघातग्रस्तांची टीम, स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला.

पुढील तीन दिवस मुसळधार

पुणे : गेल्या आठवड्यापासून राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने पावसाचा 'हायअलर्ट' दिला असून, येत्या १८ जुलैपर्यंत राज्यात ठिकठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. राज्यातील जळगाव, रत्नागिरी येथे 'रेड अलर्ट', रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, साताऱ्याला 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. तसेच, मुंबई, ठाणे, पालघर, भागांत 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. दरम्यान, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यांना 'रेड अलर्ट' देण्यात आला आहे.

'भुजबळांसाठी परतीची दारं बंद'

मुंबई : छगन भुजबळ यांनी परतीचे प्रयत्न केले तरी त्यांना पक्ष परत घेणार नाही, ही आमची भूमिका आहे, असे राष्ट्रवादी शरदचंद्र गटाचे नेते अनिल देशमुख यांनी सांगितले. एकीकडे बारामतीला जाऊन राजकीय वक्तव्य करायचं, शरद पवारांवर टीका करायची आणि मुंबईत येऊन शरद पवारांची भेट घ्यायची. पवारांना सांगायचं की, राज्यात अतिशय स्फोटक परिस्थिती आहे, या परिस्थितीत तुम्हीच मार्ग काढू शकता, अशा पद्धतीची दुटप्पी भूमिका चालणार नाही. भुजबळ हे दुटप्पी भूमिका घेऊन राजकारण करत आहेत. त्यांच्यासाठी पक्षाची परतीची दारं बंद आहेत.

२६ तासांनंतर कोकण रेल्वे सुरू

प्रवाशांचा खोळंबा

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

कोकणात अतिवृष्टीमुळे दाणादाण उडाली असून, अतिवृष्टीचाफटका कोकण रेल्वेला बसला. कोकण रेल्वेमार्गावरील दिवाणखवटी येथे रविवारी सायंकाळी दरड कोसळल्यामुळे तब्बल २६ तास कोकण रेल्वेची वाहतूक ठप्प होती. सोमवारी दुपारनंतर रेल्वे रुळावरील दरड हटविण्यात आली. त्यानंतर रुळ वाहतुकीसाठी योग्य असल्याचे प्रमाणपत्र देऊन वाहतूक सुरळीत झाली.

अखेर त्या खोळंबलेल्या सर्व गाड्या सकाळी रदद करून प्रवाशांना मुंबईत सोडण्यासाठी कोकण रेल्वेने एसटीची मदत घेतली. कोकण रेल्वेने एसटीकडून ६८ बस घेतल्या. पान ५ वर

कशेडी घाटात दरडीचा धोका

डोंगर पोखरल्याने अपघाताची भीती

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील रस्ता हा वारंवार घडणारे अपघात आणि दरडी कोसळण्याच्या घटना यामुळे दिवसेंदिवस धोकादायक ठरत असून, राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाकडून येथील संभाव्य धोक्याकडे सपशेल दुर्लक्ष केले जात आहे. गेल्यावर्षी कापलेल्या डोंगरातून यंदा लाल मातीचे ढिगारे महामार्गावर कोसळू लागले आहेत.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण कशेडी घाटात करताना महामार्गाच्या तीव्र उतार आणि वळणांवरील डोंगर कापून संबंधित ठेकेदार कंपनी एलॲण्डटीकडून डोंगर उभा कापल्यामुळे धामणदेवी हद्दीत डोंगर कोसळण्याचा धोका कायमचा निर्माण झाल्याची भीती धामणदिवीच्या नागरिकांमध्ये उघडपणे व्यक्त केली जात आहे.

यापूर्वी या डोंगरातून दरड कोसळल्यानंतर धामणदिवी गावातील काही घरांच्या भिंतीना तडे पडल्याने ठेकेदार कंपनी 'एलॲण्डटी'कडून घरे बाधितांना १२०० ते २५०० रूपयांची भरपाई देऊन बोळवण पान ५ वर

चिरेखिंड-आंबेमाची रस्त्यावर दरड

तालुक्यातील आंबेनळी घाटातील चिरेखिंड ते आंबेमाची रस्त्यावर दरडीसह मातीचा ढिगारा झाडांसह रस्त्यावर पडल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाल्यानंतर तालुका प्रशासनाने तातडीने या रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत करण्यात यश मिळविले. रविवारी महाबळेश्वर येथून परतीच्या प्रवासासाठी निघालेल्या पर्यटकांचा यामुळे खोळंबा टाळण्यात आला.

पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर वाई सुरूर या घटनेची माहिती समजल्यानंतर पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे व पान ५ वर

स्थलांतरीत कुटुंबं घरी परतली

६ गावांतील ६६ कुटुंबांतील १७३ जणांचा समावेश

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील पावसाने रविवारपर्यंत संततधार ठेवून सोमवारी काहीशी उसंत मिळविल्यानंतर स्थलांतरीत कुटुंबांनी आपापल्या घरांकडे प्रस्थान केल्याचे सार्वत्रिक दृश्य दिसून आले. सोमवारी सकाळी १५१ मी.मी. पावसाची नोंद झाल्यानंतर दिवसभरात अधूनमधून जोरदार सरी कोसळल्या. यादरम्यान, रविवारी प्रशासनाने दरडीच्या छायेखालील तसेच नदीकिनारी असलेल्या कुटुंबांतील सदस्यांचे स्थलांतर सुरक्षितस्थळी करण्यास सुरूवात केली होती.

रविवारी तहसीलदार कपिल घोरपडे, पुरवठा अव्वल कारकून आबासाहेब जगताप तसेच पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी तालुक्यातील ६ गावांतील ६६ कुटुंबांतील १७३ सदस्यांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केले. गेल्या दोन दिवसांपासून पोलादपूर तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू असून, सावित्री, कामठी, ढवळी, चोळई नद्यांना पूर आल्यानंतर पोलादपूर तहसील कार्यालयातील आपत्ती निवारण कक्ष पूरपरिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

दरम्यान, नदीकिनारी तसेच दरडींच्या छायेत असलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला. रविवारी पोलादपूर तालुक्यातील नाणेघोळ येथील १३ कुटुंबांतील ४५ सदस्य, कातळी गावातील १० कुटुंबांतील २४ सदस्य, केवनाळे आंबेमाची येथील १२ कुटुंबांतील २८ सदस्य, माटवण पान ५ वर

विश्वासघातकी लोक हिंदू कसे?

- उद्धव ठाकरेंचा विश्वासघात झालाय
- ज्योतीर्मठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांची प्रतिक्रिया

। मुंबई । प्रतिनिधी ।

उद्धव ठाकरे यांच्यासोबत विश्वासघात झाला आहे. जोपर्यंत ते पुन्हा मुख्यमंत्री होत नाही, तोपर्यंत दुःख जाणार नाही, अशी प्रतिक्रिया ज्योतीर्मठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरेंच्या भेटीनंतर दिली. कोणाचं हिंदुत्व खरं हे समजून घ्यावे लागेल. पण, जो विश्वासघात करतो, तो कधी हिंदुत्ववादी नसतो, असेही शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद म्हणाले.

शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद म्हणाले, आपण सगळे हिंदू आणि सनातन धर्माचे पालन करणारे लोक आहोत. पुण्य-पापाची भावना आपल्याकडे सांगितली आहे. सगळ्यात मोठा घात हा विश्वासघात असतो. उद्धव ठाकरे यांच्यासोबत विश्वासघात झालेला आहे, याबाबतची पीडा अनेकांना आहे. त्यांच्या निमंत्रणानंतर मी मातोश्रीवर आलो, त्यांनी माझं स्वागत केलं. पान ५ वर

'लाडकी बहीण' योजनेचा सावळागोंधळ

कनेक्टीव्हीचा अभाव, हमीपत्रात सतत बदल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला फटका बसला. विधानसभेतही या फटक्यापासून बचाव करण्यासाठी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरु केल्याची चर्चा होत आहे. या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरताना कनेक्टीव्हीचा अभाव, सर्व्हरची समस्या तसेच हमीपत्रात वारंवार बदल अशा अनेक प्रकारच्या अडचणी येत आहेत. त्यामुळे या योजनेचा सावळागोंधळ सुरु असल्याची चर्चा जिल्ह्यात सुरु आहे.

राज्य सरकारने एक जुलैपासून लाडकी बहीण योजना सुरु केली. सुरुवातीला २१ ते ६० वर्षे वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ दिला जाणार असे सांगण्यात आले होते. त्यात उत्पन्नाचा दाखला, वय व अधिवास दाखल्याचीदेखील गरज असल्याची घोषणा केली होती. त्यामुळे पान ५ वर

> लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरण्याची जबाबदारी स्वतः महिलेसह अंगणवाडी सेविका व अन्य यंत्रणेचीदेखील मदत घेतली आहे. मात्र, गावांमध्ये ॲप डाऊनलोड करण्यापासून अर्ज ऑनलाईन भरण्यापर्यंतची प्रक्रिया त्रासदायक ठरत आहे. कित्येक वेळा नेट कनेक्टीव्हीचा अभाव, त्याच सतत पाऊस पडत असल्याने गावांमधील फोनची रेंज गायब होत आहे. त्यामुळे हे अर्ज भरताना फारच वेळ जात आहे. त्यात काही अंगणवाडी सेविकांना ऑनलाईन अर्ज भरता येत नाही.
>
> – अंगणवाडी सेविका

शाळा सोडल्याच्या दाखल्यासाठी महिलांची लगबग

लाडकी बहीण योजनेसाठी वय अधिवास दाखल्याऐवजी शाळा सोडल्याचा दाखला स्वीकारला जाणार असल्याचे सरकारने घोषित केले. त्यामुळे हा दाखला मिळविण्यासाठी महिलांची लगबग सुरु झाली आहे. जिल्हा परिषद शाळांसह माध्यमिक शाळांमध्ये दाखले घेण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे. हे दाखले वेळेवर देण्यासाठी शिक्षकांचीदेखील दमछाक होत आहे. नियमित कामे सोडून हे दाखले देण्यासाठी शिक्षक कामाला लागल्याचे चित्र दिसून येत आहे.

बाळ-बाळंतीण सुखरुप; नर्सच्या सतर्कतेमुळे वाचले प्राण

...अन् रिक्षातच तिने दिला बाळाला जन्म

। अलिबाग । प्रमोद जाधव ।

एका बाजूला विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस, दुसऱ्या बाजूला 'त्या' गर्भवतीच्या प्रसववेदना तीव्र होत्या. ती मदतीचा हात मागत होती. रिक्षाचालकानेही प्रसंगावधान दाखवत रिक्षा थांबवली. तो दिवस होता, गुरुवार, वेळ रात्री पावणे नऊ वाजता. रस्त्यावर गर्दी वाढली. मानीफाटा येथे आपल्या बहिणीकडे राहण्यास आलेल्या जिल्हा रुग्णालयातील स्वाती मयेकर या स्टाफ नर्सने महिलेची स्थिती पाहून माणुसकी दाखवत रिक्षातच तिची प्रसूती केली. प्रसूतीसाठी लागणारे कोणतेही उपकरण उपलब्ध नसतानाही नर्सच्या सतर्कतेमुळे बाळ-बाळंतीणीला जीवदान मिळाले. ते नवजात अर्भक मुलगी असून, जिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहे.

अलिबागमधील जिल्हा रुग्णालयातील स्टाफ नर्स स्वाती मुरलीधर मयेकर त्यांचे कर्तव्य बजावून आपली बहीण ॲड. उत्तरा मयेकर यांच्याकडे मानीफाटा येथे आल्या होत्या. पावसाने जोर धरल्याने घरातील विद्युतपुरवठा खंडित झाला होता. सर्वत्र अंधार होता. त्यामुळे दोन्ही बहिणी घरात गप्पागोष्टी करीत बसल्या होत्या. रात्री पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घरासमोर एक रिक्षा आली. रिक्षातील एक महिला जोरजोराने ओरडून मदतीचा हात मागत होती. वाचवा-वाचवा असे जोराने सांगत होते. रिक्षातील महिलेचा आवाज उत्तरा मयेकर व स्वाती मयेकर यांच्या कानी पडला. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता, त्या रिक्षात एक गरोदर महिला दिसली. तिला प्रसूती वेदना असह्य झाल्याने ती जोरजोराने ओरडत होती. स्वाती मयेकर यांनी जवळ जाऊन पाहिले. त्यावेळी ती महिला एका अर्भकाला जन्म देण्याच्या तयारीत होती. तिच्या पोटातील बाळाने मान बाहेर काढली होती. मात्र, पावसामुळे रुग्णालयात पोहोचणेदेखील कठीण होते. तिला रिक्षातून बाहेर काढणेदेखील धोक्याचे होते. अखेर स्वाती मयेकर यांनी माणुसकी दाखवत त्या महिलेची रिक्षातच प्रसूती केली. त्या महिलेने एका मुलीला जन्म दिला. त्यानंतर नाळ कापण्यासाठी काहीही साधन नसल्याने त्यांनी जिल्हा रुग्णालयात संपर्क साधून त्या महिलेला उपचारासाठी दाखल करण्यास सांगितले. आज ती महिला व तिची मुलगी सुखरूप असून, रुग्णालयात उपचार घेत आहेत.

त्या महिलेचे नाव सोनाली शैलेश वाघमारे असून, त्यांचे गाव म्हात्रोळी हे आहे. जिल्हा रुग्णालयातील स्टाफ नर्स स्वाती मयेकर यांनी दाखवलेला धाडसीपणा आणि माणुसकीमुळे सोनालीची प्रसूती सुखरुप झाली.

महिलेवर उपचार सुरू

संबंधित महिलेवर त्या स्थितीत प्रसूती करण्याचे आव्हान होते. रिक्षामध्ये प्रसूती करताना कोणतीही इजा पोहोचू द्यायची नव्हती. त्यांना कोणतेही इन्फेक्शन होऊ नये याची काळजी घेणे गरजेचे होते, असे स्वाती मयेकर यांनी सांगितले.

पीक विमा भरण्यासाठी मुदतवाढ

। मुंबई । प्रतिनिधी ।

केंद्र सरकारने प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत असलेल्या शेतकऱ्यांसाठी पीक विमा भरण्याची मुदत वाढवली आहे. ३१ जुलैपर्यंत पीक विमा भरण्याची मुदतवाढ दिली आहे, त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने केंद्राकडे मुदत वाढवण्याची मागणी केली होती. त्यानंतर प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत एक रुपयात पीक विमा भरण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदवाढ करण्यात आली आहे. याआधी पीक विमा भरण्याची अंतिम मुदत १५ जुलै देण्यात आली होती.

पुरात हरवलेल्या व्यक्तीचा मृतदेह सापडला

नेरळ : कर्जत तालुक्यातील गौरकामत ग्रामपंचायतीमधील डोणेवाडी येथील ५० वर्षीय व्यक्ती १३ जुलै रोजी सकाळी प्रचंड पावसामुळे आलेल्या महापुरात वाहून गेला होता. त्या व्यक्तीचा मृतदेह सोमवारी सकाळी उल्हास नदीमधील बेंडसे येथे आढळून आला आहे. गौरकामत ग्रामपंचायतीमधील डोणेवाडी या वाडीमधील बाळू रतन पवार ही कातकरी समाजाची व्यक्ती तब्येत बरी नसल्याने १३ जुलै रोजी कडाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी निघाली होती. गौरकामत आणि जांभिवली गावाच्या मध्ये असलेल्या लहान ओढ्याला संततधार पावसामुळे भरपूर पाणी होते. त्या ओढ्यावरून वाट काढत असताना बाळू पवार वाहून गेल्याची शक्यता आहे.

शुद्धीपत्रक

तमाम जनतेस या शुद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दैनिक कृषीवल या वर्तमानपत्राच्या तारीख १०/०७/२०२४ रोजीच्या अंकाच्या पान नं. ७ वर मौजे धोकवडे, ता. अलिबाग येथील गट नं. ६३६ या मिळकतीसंदर्भात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहीर नोटीसीमध्ये मिळकतीचे वर्णन 'गट नं. ६३६' एवजी टंकलेखनाच्या चुकीमुळे 'गट नं. ६२६' असे नमुद झाले आहे. तरी सदर मिळकतीचा 'गट नं. ६२६' ऐवजी 'गट नं. ६३६' असा वाचण्यात यावा.

जाहीर नोटीसीतील उर्वरीत मजकुर जसाच्या तसा वाचण्यात यावा.

अलिबाग
ता. १५/०७/२०२४

ॲड. विधान अरविंद पाटील
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation@gmail.com
जा.क्र. पमपा/मातंवि/२२२४/प्र.क्र.०२/३२३/२०२४ दिनांक : १५/०७/२०२४

अंदाजपत्र बनविणेकामी

अनु.क्र.	निविदा क्र.	कामाचे नाव
१.	निविदा/पमपा/मातंवि/२२२४/प्र.क्र.०२ ३२३/२०२४-२५	पनवेल महानगरपालिका मालकीच्या कार्यालयात असणाऱ्या झेरॉक्स मशीन्सचे टोनर खरेदी करणेकामी दर मंजूर करणेबाबत.

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. १६/०७/२०२४ ते दि. २२/०७/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे झिराड गट नं. २३३/२ (जुना गट नं. ३११/ब) या मिळकतीपैकी ० हे. ४६.३० आर, आकार १२ रूपये ०७ पैसे ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे. यापुढे त्या मिळकतीस 'सदर मिळकत' असे संबोधण्यात आले आहे.

सदर मिळकत ही मुळची श्री. रोहिदास रामचंद्र म्हात्रे यांच्या मालकीची होती. सन १९९३ चे सुमारास आमचे अशिल श्री अशोक सखाराम म्हात्रे रा. झिराड यांची आई सुमती सखाराम म्हात्रे व तिचे भाऊ राजाराम धर्मा गुरव, द्वारकानाथ धर्मा गुरव, व चिंतामण धर्मा गुरव अशा चौघांनी त्यांच्या सामायिक मालकीच्या मौजे आगरसुरे गट नं. ६१ या मिळकतीपैकी ० हे. ४०.८० आर एवढे क्षेत्र रोहिदास रामचंद्र म्हात्रे यांस बदली देऊन त्यांचेकडील वर वर्णन केलेली मौजे झिराड गट नं. २३३/२ (जुना गट नं. ३११/ब) ही मिळकत अदलाबदलीने घेतली. गट नं. २३३/२ या मिळकतींतील जास्तीच्या क्षेत्राकरीता रोहिदास रामचंद्र म्हात्रे यांस रोख रक्कम देण्यात आली. मात्र सदर व्यवहाराबाबत कोणत्याही प्रकारच्या अदलाबदलीचा अथवा खरेदीचा दस्त नोंदविण्यात आलेला नाही व केवळ आगरसुरे फेरफार नं. २३१ व झिराड फेरफार नं. ३४८ कडे फेरफार नोंदी घालून एकमेकांची नावे ७/१२ सदरी लावण्यात आली आहेत. मात्र राजाराम धर्मा गुरव, द्वारकानाथ धर्मा गुरव यांनी लबाडी करून झिराड फेरफार नं. ३४८ मध्ये आमचे अशिलांची आई सुमती सखाराम म्हात्रे हिचे नाव नमूद केलेले नाही. त्यामुळे झिराड गट नं. २३३/२ (जुना गट नं. ३११/ब) या मिळकतीच्या ७/१२ वर सुमती सखाराम म्हात्रे यांचे नांव भोगवटादार सदरी नमूद नाही.

असे असले तरी सदर मिळकतीमध्ये आमच्या अशिलांची आई सुमती सखाराम म्हात्रे हिचा १/४ अविभक्त हिस्सा (क्षेत्र सुमारे ०.१७.८ आर.) होता व आहे. सुमती सखाराम म्हात्रे या ता. १४/०२/२०२४ रोजी मृत्यु पावल्या असून आमचे अशिल श्री अशोक सखाराम म्हात्रे व त्यांची बहिण सुचिता सुरेश म्हात्रे असे दोघे त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

आमचे अशिलांनी श्री राजाराम धर्मा गुरव वगैरे यांचे विरुध्द कुटुंबाच्या मिळकतींचे वाटपा करिता व निर्तुटक ताब्याकरिता रे.मु.नं. १४७/२०२२ कडे दावा दाखल केलेला आहे. तो न्याय प्रविष्ठ आहे. सदर दाव्यामध्ये वर वर्णन केलेली मौजे झिराड गट नं. २३३/२ हि मिळकत कुटुंबाची मिळकत म्हणून समाविष्ट करणेबाबत आमचे अशिल योग्य ती कार्यवाही करीत आहेत.

दरम्यानचे काळात आमच्या अशिलांच्या आईचे अथवा आमचे अशिलांचे नाव गट नं. २३३/२ (जुना गट नं. ३११/ब) या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर नाही या बाबीचा गैरफायदा घेवून द्वारकानाथ व राजाराम धर्मा गुरव यांचे वारस मौजे झिराड गट नं. २३३/२ हि मिळकत विकण्याच्या विचारांत असून जाहिर नोटीस देखील प्रसिद्ध न करता गुपचुप खरेदीखत रजिस्टर्ड करण्याच्या तयारीत आहेत. असे आमचे अशिलांस खात्रीलायकरित्या कळले आहे.

सबब, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यांत येते की, कुणीही मौजे झिराड गट नं. २३३/२ (जुना गट नं. ३११/ब) या मिळकतीविषयी अथवा तिचे कोणत्याही भागाविषयी श्रीमती राजश्री राजाराम गुरव, किशोर राजाराम गुरव, चेतना विजय पाटील, अनुजा अनुज पाटील, महेश द्वारकानाथ गुरव, भारती विलास राऊत व प्राची प्रमोद घरत यांचे बरोबर अथवा त्यांचेपैकी कुणाही बरोबर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये, केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशिल संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १६/७/२०२४

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

जाहीर नोटीस

अर्ज क्र. : - /०६/२०२४

मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात

श्रीम. शकुंतला शांताराम मारणे
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. भाग्यश्री भागोजी पवार
लग्नानंतरचे नाव
वय ५० वर्षे, धंदा : शेती. — अर्जदार
कायमचा पत्ता :- रा. ताम्हणे/गोरेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड
सध्याचा पत्ता :- कुंभार चाळ,
यशवंत नगर नं. १, गणेश मंदिराच्या जवळ,
तीन डोंगरी, गोरेगांव वेस्ट, मुंबई- ४००१०४

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत उणेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. शकुंतला शांताराम मारणे- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. भाग्यश्री भागोजी पवार- लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे वावे/निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०५/०५/१९७४ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. १३८ ने दि. ०५/०६/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे वावे/निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०५/०५/१९७४ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. शकुंतला शांताराम मारणे- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. भाग्यश्री भागोजी पवार- लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे वावे/ निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०५/०५/१९७४ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. १०/०७/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकत श्री. संतोष भरत थळे, राहणार टेकाळी, ता. अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. संतोष भरत थळे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तहेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपिभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
टेकाळी, ता. अलिबाग.	३८४	०-०५-०० एकूण	०-११

अलिबाग,
दिनांक : १५/०७/२०२४.

सही/
(ॲड. संजय म. भगत)
हिराबाग सोसायटी,
ए विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

एच.पी. गॅस ग्राहकांना सूचना

अलिबाग व पेण तालुक्यातील एच.पी. गॅस ग्राहकांना कळविण्यात येते की, ज्या ग्राहकांचे आधार कार्ड आपल्या ग्राहका क्रमांकाशी लिंक (थम्स) म्हणजे EKYC करुन झालेले नसतील अशा ग्राहकांनी त्वरीत H.P. गॅस रायगड बाजार अलिबाग, शाखा पेण, चोंढी, रेवदंडा व पेझारी येथे जाऊन आधार कार्ड लिंक (थम्स) EKYC करुन घेणे अत्यंत जरुरीचे आहे. जे एच. पी. गॅस ग्राहक आधार कार्ड लिंक (थम्स) करुन घेणार नाहीत अशा एच.पी. गॅस ग्राहकांची गॅस सिलिंडर सप्लाय बंद होऊ शकते किंवा यापुढे आपल्याला सिलिंडर सबसिडीचा कदापी लाभ मिळणार नाही.

तरी EKYC पेंडींग असलेल्या एच.पी. गॅस ग्राहकांनी गॅस एजन्सीमध्ये जाऊन EKYC करुन घेणे अनिवार्य आहे, नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची सर्व एच. पी. गॅस ग्राहकांनी नोंद घ्यावी.

कळावे

मॅनेजर
रायगड बाजार एच.पी.गॅस

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात

(तहसिलदार कार्यालय, मुरूड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)

ज.म.र.अर्ज १२७/२०२४

जाहीर नोटीस

प्रति,
श्री रोशन राम शेडगे,
रा. चोरढे, ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड — **अर्जदार**
विरूध्द
ग्रुप ग्रामपंचायत चोरढे,
ता. मुरुड जंजिरा, जि.रायगड — **सामनेवाला**

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त श्री रोशन राम शेडगे त्यांचे आजोबा के पादुरंग महादेव (काळया) शेडगे रोजी राहत्या घरी म्हणजे चोरढे, ता. मुरूड, जि. रायगड ७/२/१९९२ येथे मयत झालेली असून त्यांच्या मृत्यूची नोंद तळेखार यांचे जन्म - मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्य नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ / मॅरेज अॅन्ड डेथ अॅक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी कै. नथु कमळया तळेकर हया दिनांक ०८/०४/१९७२ रोजी मयत झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयात दि. १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांचे आजोबाआजोबा कै.पादुरंग महादेव (काळया) शेडगे हयांची जन्म - मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही..

आज ता. ९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे,

सही/-
(रोहन शिंदे)
तहसिलदार मुरूड जंजिरा

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन
मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

जमिन मालकाचे नाव	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
विलास रामचंद्र कार्ले	३१	६	०-३३-००	०.१६

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १६/०७/२०२४

ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर
पत्ताः कोर्ट व्यु को. ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो. ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

ॲड. राजेंद्र पी. निगुडकर
पत्ताः ओम श्री भाग्योदय को. ऑप. हौ.सो.
कोतवाल नगर, कर्जत, जि. रायगड
मो. ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक गॉडफ्री पारकोल जेसेंटो यांचेसोबत चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
सुरई ता. मुरूड	४३	०-०६-३०	१.१४
सुरई ता. मुरूड	४६	०-०६-३०	१.१४
मांडला ता. मुरूड	१४	०-४१-५०	८.२९

वर नमूद मौजे मांडला, ता. मुरूड, जि. रायगड वरील गट नं. १४ मधील क्षेत्र ०-४१-५० हे.आर. या क्षेत्रापैकी प्रत्यक्ष जागेवर मोजणी करून झाल्यानंतर जे क्षेत्र मिळेल त्या क्षेत्राचे खरेदीखताचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १५/०७/२०२४

सही/-
ॲड. राकेश नारायण पाटील
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात

(तहसिलदार कार्यालय, मुरूड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)

ज.म.र.अर्ज १२४/२०२४

जाहीर नोटीस

प्रति,
सुनील सुरेश तळेकर
रा. तळेखार, ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड — **अर्जदार**
विरूध्द
ग्रुप ग्रामपंचायत तळेखार,
ता. मुरुड जंजिरा, जि.रायगड — **सामनेवाला**

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त सुरेश नारायण तळेकर त्यांचे कै. नथु कमळ्या तळकर ही दिनांक ०८/०४/१९७२ रोजी राहत्या घरी म्हणजे तळेखार, ता. मुरूड, जि. रायगड येथे मयत झालेली असून त्यांच्या मृत्यूची नोंद तळेखार यांचे जन्म - मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ / मॅरेज अॅन्ड डेथ अॅक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी कै. नथु कमळ्या तळेकर ह्या दिनांक ०८/०४/१९७२ रोजी मयत झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयात दि. १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांचे आजोबा कै. नथु कमळ्या तळेकर ह्यांची जन्म - मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही..

आज ता. ९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
(रोहन शिंदे)
तहसिलदार मुरूड जंजिरा

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक इलियास शामसुद्दिन सय्यद रा. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पैसे)
वरसोली, ता. अलिबाग	१९/ब/३	०-०३-६७ (बिनशेती ३६७ चौ.मी.)	३६-७०

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि.१५-०७-२०२४

सही/-
ॲड. आर. बी. कोसमकर
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हण आळी अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे आत्करगाव, ता. खालापूर, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती जमीन मिळकत व त्यावरील बांधकाम आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक एच. पी. एस. इंजिनिअर्स तर्फे प्रो. प्रा. इंदरजित सिंग यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे आत्करगाव, ता. खालापूर, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत

गट नं.	क्षेत्र (आर. चौ. मी.)	आकार (रू.पै.)
२२४	१०३-००-०० व त्यावरील ग्रुप ग्रामपंचायत आत्करगाव हद्दीतील मालमत्ता क्र.१३० क्षेत्र २१०४ चौ.मी.	१०३०-००

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १६/०७/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतींचे विद्यमान मालक श्रीमती मिनाक्षी विजय भार्गव यांचेकडून खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकतीमधील मालकी हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे मापगाव, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील

भूमापन क्रमांक	उपविभाग क्रमांक	क्षेत्र हे आर.चौ.मी.	आकार रू.पै.
१०८	२	००-१५-१०	००.७४
११०	२	००-२४-६०	१.३७
११२	--	००-४६-६०	२.५७
११६	--	००-६७-२०	१.३१
११८	--	००-२८-१०	००.५०
११९	--	००-०३-००	००.०६
१२२	--	००-२६-१०	००.४५
१२३	--	००-३३-१०	००.५८
१३१	--	०१-३६-००	२५.३३
१३२	--	००-१७-५०	३.७२
१३३	२	००-४८-१०	१.८१
१३९	--	००-३८-००	१.८७

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १६/०७/२०२४

ॲड. रविंद्र वि. ओक
'गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात

(तहसिलदार कार्यालय, मुरूड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)

ज.म.र.अर्ज ६३/२०२४

जाहीर नोटीस

प्रति,
खालीद रेहमान ऐनुल्ला
रा.मुरूड, ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड — **अर्जदार**
विरूध्द
मुरूड-जंजिरा नगरपरिषद
ता. मुरुड जंजिरा, जि.रायगड — **सामनेवाला**

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त खालीद रेहमान ऐनुल्ला त्यांचे वडिल कै. अब्दुल रहेमान सि. हसन ऐनुल्ला ही दिनांक १६/०८/२०१२ रोजी राहत्या घरी म्हणजे मुरूड जंजिरा, ता. मुरूड, जि. रायगड येथे मयत झालेली असून त्यांच्या मृत्यूची नोंद नगरपरिषद मुरूड कार्यालयात यांचे जन्म - मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अॅन्ड डेथ अॅक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी कै. अब्दुल रहेमान सि. हसन ऐनुल्ला ह्या दिनांक १६/०८/२०१२ रोजी मयत झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयात दि. १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांचे वडिल कै. अब्दुल रहेमान सि. हसन ऐनुल्ला ह्यांची जन्म - मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
(रोहन शिंदे)
तहसिलदार मुरूड जंजिरा

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-अरवंद, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमूद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांनी पडताळणी करीत आहोत.

जमीन मिळकतीचे वर्णन
मौजे- अरवंद, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

भोगवटाधारकाचे नाव	सर्व्हे नं./ हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
श्री नामदेव हिरू धुळे श्री. शांताराम हिरू धुळे श्रीम. ताराबाई गोटीराम म्हसकर श्रीम. इंदिराबाई काशिनाथ ऐनकर	१५/२०/अ	०.०९.४०	१.००

वरीलप्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभूत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळहक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यू. हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. नामदेव हिरू धुळे व इतर ३ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून मालकी हक्काचे प्रमाणपत्र व ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : १४/०७/२०२४

सही/-
ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे
पत्ता- शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.नं. ७४१०४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

क्षणिक

तरुणाचा अपघाती मृत्यू

पनवेल : कळंबोली सर्कल जवळ ट्रेलरने दुचाकीला दिलेल्या धडकेत २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी ट्रेलर चालका विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेश बेनबनसी हा होंडा स्प्लेंडर (एमएच-४६-सीएन-८१०२) घेऊन जात असताना ट्रेलर चालकाने त्याच्या दुचाकीला धडक दिली. यात राजेश गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

महिलेची डॉक्टराला मारहाण

पनवेल : डॉक्टर पुज झा यांच्या क्लिनिकमध्ये येऊन हाताने मारहाण करून हातातील आयफोन खेचू लागली. विरोध केल्याने दोन्ही हातावर नखाने ओरखडे मारून आयफोन घेतला त्यानंतर सॅमसंग कंपनीचा मोबाईल देखील घेऊन ती निघून गेली. १ लाख १० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल घेऊन गेल्या प्रकरणी आणि मारहाण केल्या प्रकरणी आदिती सरीन (वय ३७, राहणार पनवेल) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या महिलेला अटक करण्यात आली आहे.

कार खड्ड्यात कलंडली

पनवेल : पनवेलकडून नेरेच्या दिशेने जाणारी कार (एमएच-०४-एफझेड-५०१४) जात होती. विहीघरच्या पुढे कार आली असता एका रिक्षाला वाचवण्याचा प्रयत्न करताना या कारवरील चालकाचा ताबा सुटला आणि कार रस्त्याच्या बाजूला असलेल्या खड्ड्यात कलंडली. या कारमधून तिघेजण प्रवास करत होते. सुदैवाने ही कार पलटी झाली नाही. त्यामुळे या अपघातात कोणीही जखमी झाले नाही. काही वेळाने टोविंगच्या सहाय्याने ही कार बाहेर काढण्यात आली.

तहसीलदार कार्यालयाचे स्थलांतर

म्हसळा : म्हसळा तहसील कार्यालयाची सुमारे सव्वाशे वर्ष जुन्या इमारतीत कार्यालय कार्यरत होते. अतिवृष्टीत इमारत केंव्हाही कोसळण्याची भीती निर्माण झाली होती. कार्यालयाच्या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले होते. या ऑडीटमध्ये कार्यालयाची इमारत धोकादायक असून, कार्यालयाचे इतर इमारतीमध्ये स्थलांतर करण्याबाबत सुचविले होते. त्या अनुषंगाने दिघी रोडवरील पाचगांव आगरी समाज संस्था या ठिकाणी स्थलांतर करण्यात आले.

आषाढी एकादशी उत्सव

अलिबाग : तालुक्यातील वरसोली येथील श्री क्षेत्र विठोबा देवस्थान ट्रस्टच्यावतीने आषाढी एकादशी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि.१७) सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. बुधवारी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास काकड आरती, महाभिषेक होणार आहे. त्यानंतर सकाळी अकरा ते दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास भजनांचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

बारा तालुक्यांना पावसाचा फटका

- घरांसह गुरांच्या गोठ्यांची पडझड
- नुकसानग्रस्तांना भरपाईची प्रतिक्षा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात पावसाचा जोर वाढत असून अलिबागसह बारा तालुक्यांना पावसाचा फटका बसला आहे. दिवसभर पाऊस सुरू राहिल्याने अनेक घरांसह गोठ्यांची पडझड झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात मोठी वित्तहानी झाल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये महाड, पोलादपूर, माथेरान, खालापूर, कर्जत, माणगांव व पनवेल या ठिकाणी १०० मि.मी.पेक्षा अधिक पाऊस पडला असून अन्य तालुक्यात ६५ मि.मी. पेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. या पावसामध्ये अलिबाग तालुक्यातील ताडवागळे, चरी आदिवासीवाडी, महाजने दिवीवाडी येथील १२ हून अधिक घरांसह गोठ्यांची पडझड. रोहामध्ये बाळसई येथील घरांचे नुकसान. सुधागड पालीमध्ये झालेल्या अतिवृष्टीत महागाव, दर्यागाव येथील घरांसह गुरांचे गोठे, माणगावमधील साई, सोमजाई नगर, खरवली, तळामधील रोवळे, बेलघर, मेढा येथील घरांसह गोठे तसेच मुरूडमधील ३२ घरांचे पत्रे उडाल्याने नुकसान झाले आहे. खालापूरमधील शिवगांव, बिडखुर्द, घोडीवलील, होराळे, पनवेलमधील देवीचापाडा, पाले खुर्द, पोलादपूरमधील आडावळे खुर्द येथील घरांचे नुकसान झाले आहे. आपटा गावातील काही घरांमध्ये पाणी शिरल्याने घरातील विद्यूत उपकरणे व धान्यांचे नुकसान झाले आहे. तसेच, माणगांवमधील वाढवण येथील बैल पाण्यात बूडून मृत झाल्याची घटना घडली असून या पावसात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झालेली आहे. या नुकसानीचे पंचनामे प्रशासनाने तातडीने करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

344 नागरिकांचे स्थलांतर

रायगड जिल्ह्यामध्ये मागील २४ तासात पावसाचा जोर वाढला असून या पावसाचा फटका मुरूड, पेण, तळा, पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त व पुरग्रस्त गावांना बसला आहे. यावेळी अकरा कुटूंबातील ३४४ नागरिकांचे ११ ठिकाणी स्थलांतर करण्यास प्रशासनाला यश आले आहे. उर्वरित ३६ कुटूंबातील १३१ नागरिकांना त्यांच्या नातेवाईकांकडे स्थलांतरीत केल्याची माहिती देण्यात आली आहे.

19 धरणे फुल्ल

रायगड जिल्ह्यात लघू पाट बंधारे विभागाच्या अखत्यारित २८ धरणे आहेत. या धरणांमार्फत रायगड जिल्ह्यासह नवी मुंबईतील नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. गेल्या अनेक दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे या धरणांमध्ये जलसाठा वाढला आहे. जिल्ह्यातील २८ धरणांपैकी १९ धरणे फुल्ल झाली आहेत. अंबा, कुंडलिका, पाताळगंगा या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असून इतर नद्यांची पातळी इशारा पातळीपेक्षा कमी असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

दिव्यांगाच्या प्रश्नांबाबत धरणे आंदोलन

- शासनाच्या योजनेपासून दिव्यांग वंचित
- मागण्या पूर्ण होईपर्यंत लढा सुरु राहणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शासनाच्या योजनेपासून अनेक दिव्यांग वंचित आहेत. दिव्यांग निराधार योजनेपासून पिवळी शिधापत्रिका व अन्य सुविधा मिळत नसल्याचा आरोप करीत दिव्यांगाच्या विविध प्रश्नांबाबत दिव्यांग क्रांती संघटना व दिव्यांग उत्कर्ष सामाजिक संस्थेच्यावतीने अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सोमवारी (दि.१५) करण्यात आले. यावेळी शासनाविरोधात घोषणा देत मागण्या पूर्ण होईपर्यंत लढा सुरु राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष बी. जी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा लढा सुरू करण्यात आला आहे. दिव्यांग व निराधार यांना मिळणाऱ्या अनुदानात वाढ करून ती ५ हजार रुपये करण्यात यावी. दिव्यांगाच्या विकासाच्या योजनांचा लाभ देताना उत्पन्नाचा दाखल्याची अट रद्द करावी. अंत्योदय योजनेअंतर्गत पिवळी शिधापत्रिका देण्यात यावी. संजयगांधी दिव्यांग योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना व अन्य योजनांचे अनुदान दर महिन्याला नियमीत करावे. मालमत्ता व घरपट्टी करात ५० टक्के सवलत मिळावी. ग्रामपंचायत व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातील दिव्यांगाना ५ टक्के निधीचा लाघ मिळत नसेल, तर संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गून्हे दाखल करावेत. व्यवसायासाठी जागा व स्टॉल, व्यवसाय परवाने देण्यात यावेत अशा अनेक मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले.

अलिबाग मधील महाजने येथील नदीचे रौद्ररूप

नागोठण्यातील तरुणांच्या जिद्दीला सलाम

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठणे अंबा नदीला रविवारी (दि.१४) आलेल्या पुराचे पाणी वाढत असतानाच अंबा नदी किनारी स्मशानभूमी जवळच्या शेडमध्ये पुराच्या पाण्यात अडकलेल्या दोन व्यक्तींना सुखरूप बाहेर काढून त्यांचे प्राण वाचविण्यात नागोठणे कोळीवाड्यातील तरुणांना यश आले आहे. याचबरोबर कोळीवाड्या लगत असलेल्या लेकव्हू हॉटेल समोरील रस्त्यावर पाण्यात अडकलेल्या एक टेम्पो व दोन हुंडाई वेन्यू कारला बाहेर काढून या गाड्या वाहून जाण्यापासून वाचविल्या आहेत.

नागोठणे कोळीवाड्यातील तरुणांनी दाखविलेल्या धैर्याला व त्यांच्या जिद्दीला सलाम करण्यात येत असून त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. या बहाद्दर तरुणांमध्ये संदीप कोळी, टिळक कोळी, सचिन कोळी, बळीराम कोळी, मनीष कोळी, महेश कोळी, सुमित कोळी, रुपेश कोळी आदींसह इतर दहा तरुणांचा समावेश होता.

नागोठण्यातील अंबा नदी किनारी असलेल्या स्मशानभूमी जवळील शेडला चारही बाजूंनी पुराच्या पाण्याने वेढा घातलेला असतानाच नागोठणे कोळीवाड्यातील या तरुणांनी पुराच्या पाण्यातून वाट काढत आपली होडी स्मशानभूमी शेड जवळ नेली व तेथे अडकलेल्या दोन व्यक्तींना सुखरूप बाहेर काढले. तसेच, लेक्व्ह्यू हॉटेल जवळील पेणकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुराच्या पाण्यात अडकलेल्या तीन वाहनांना पुराचे पाणी मानेपर्यंत आलेले असतानाही त्यांनी धैर्याने या तिन्ही वाहनांना उपलब्ध साधसामग्रीच्या साहाय्याने बाहेर काढण्याची कौतुकास्पद कामगिरी करीत पोलीस प्रशासनालाही सहकार्य केले आहे.

अतिवृष्टीत गाभण म्हशी गेल्या वाहून

। म्हसळा । वार्ताहर ।

मागील पाच दिवस म्हसळा तालुक्यात संततधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आले असून ८ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीत पाष्टी येथिल दुध व्यवसायीक जगजीवन लाड यांच्या दोन गाभण म्हशी वाहून गेल्याची घटना घडली आहे. रोजच्या प्रमाणे लाड यांच्या म्हशी देहण जंगलभागात चरण्यासाठी गेल्या असता त्या सायंकाळी घरी परतत असताना पाष्टी देहन नदिला पावसाचे पाण्याने पुर आला होता. या पुरात दोन्ही म्हशी वाहून गेल्याने जीवन लाड यांचे सुमारे १.८० लक्ष रूपयांचे नुकसान झाले असल्याचे म्हसळा महसुल विभगामार्फत केलेल्या पंचनाम्यात नमुद करण्यात आले आहे.

वरई-आरवंद रस्त्यावर पुन्हा खड्डे

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील वरई ते आरवंद या भागातील रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून अडीच कोटी रुपये खर्चून बनविण्यात आला होता. मात्र, मागील दोन वर्षात पुन्हा एकदा त्या रस्त्यावर खड्डे पडले असून तेथील रहिवाशी यांचा प्रवास पुन्हा एकदा खड्ड्यातून कायम आहे.

कर्जत-मुरबाड या राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरून पोसरी ते आरवंद असा रस्ता आहे. या रस्त्याचे डांबरीकरण मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात आले होते. २०२१ मध्ये या रस्त्याच्या कामासाठी अडीच कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. त्यानंतर रस्त्यावर पुढील काही वर्षे देखभाल दुरुस्ती ठेवण्याचे काम ग्रामसडक योजना करीत असते. दुसरीकड या रस्त्यावर सातत्याने खड्डे पडण्याची घटना मागील वर्षी देखील घडली होती. त्यानंतर पुन्हा एकदा त्या रस्त्यावर खड्डे पडले असून स्थानिक ग्रामस्थांसाठी त्रासदायक बनले आहेत. वाहनचालकांचा सुरक्षित प्रवास होण्यासाठी हा रास्ता पुन्हा दुरुस्त करावा, अशी मागणी वरईचे माजी उपसरपंच दीपक धुळे यांनी केली आहे.

खड्ड्यात पाय पडून महिला जखमी

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान या पर्यटनस्थळी पर्यावरण पूरक रस्ते बनविण्यात आले असून शहरातील महात्मा गांधी रस्त्यावरील क्ले पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले आहेत. मात्र, त्यातील काही क्ले पेव्हर ब्लॉक हे निघून गेले आहेत. त्याच एका पेव्हर ब्लॉकच्या खड्ड्यात एका पर्यटक महिलेचा पाय रुतला आणि त्या जखमी झाल्या. त्यामुळे माथेरान नगरपरिषदेने काही दिवसांपूर्वी हेच खड्डे भरले होते काय, असा प्रश्न शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख कुलदीप जाधवांनी केला आहे.

माथेरान मध्ये शनिवार, रविवार व इतर दिवशी पर्यटकांची पावसाळी हंगामाची गर्दी होत असते. शहरात पर्यावरण पूरक रस्ते अनेक ठिकाणी बनविले आहेत. त्यातील महात्मा गांधी रस्त्यावरील टपाल पेटी ते माथेरान रेल्वे स्टेशन या भागातील रस्त्यावर बसवलेले क्ले पेव्हर ब्लॉक निखळले आहेत. त्यातील एका खड्ड्यात रविवारी (दि.१४) एका महिला पर्यटकाचा पाय अडकून त्यांचा पाय मुरगळला. त्यानंतर त्या महिला पर्यटक विव्हळत बसल्या असल्याचे दिसून आले. यानंतर ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख कुलदीप जाधव यांनी पालिकेच्या ठिसाळ कारभाराबाबत प्रश्न उभे केले आहेत.

राष्ट्रीय महामार्गावर तळे

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत-मुरबाड महामार्गावरील कळंब गावाजवळील रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या रस्त्यावरील खड्डे मोठ्या आकाराचे असून त्या ठिकाणी पावसाचे पाणी साचून तळे निर्माण झाले आहे. या तळ्यातून आम्ही मार्ग कसा काढायचा, असा प्रश्न साळोख गावाचे माजी उपसरपंच असीम बुबेरे यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, या रस्त्याच्या राष्ट्रीय महामार्ग दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहापूर ते खोपोली या महामार्गावरील बहुसंख्य रस्ता हा काँक्रीटचा बनला आहे. मात्र, कर्जत तालुक्यातील कळंब येथील काही भाग हा डांबरी रस्त्याचा आहे आणि त्याच भागातील रस्ता सध्या चर्चेचा विषय बनला आहे. कर्जत-मुरबाड रस्त्यावरील कळंब येथील पोलीस चौकीच्या पुढे असलेल्या भागातील रस्ता सुरवातीच्या पावसातच वाहून गेला आहे. त्या ठिकाणी मोठे खड्डे पडले असून त्यांना तळ्याचे स्वरूप आले आहे. यातून वाहने काढायची कशी, असा प्रश्न वाहनचालकांना पडला आहे.

दरम्यान, या भागातील रस्ता हा वळणदार असून या रस्त्याने मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असते. रस्त्याचे वळण कमी करण्यासाठी एक पूल बांधला आहे. मात्र, दोन वर्षे झाली असून त्या नवीन पुलावरून वाहतूक अद्यापही सुरू करण्यात आलेली नाही.

मुसळधार पावसात सुरू होती मोहीम

कोथळीगडाच्या ढासळलेल्या बुरुजाची दुरुस्ती

। नेरळ । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील कर्जत तालुक्यातील कोथळी गडावरील बुरुज ढासळला होता. या बुरुजाची दुरुस्ती करण्यासाठी भर पावसात सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्तानकडून मोहीम आखण्यात आली होती. आणि ती मोहीम शेकडो हातांनी यशस्वी देखील केली आहे. यावेळी सह्याद्री प्रतिष्ठानच्या १०० दुर्गसेवकांनी तो बुरुज पुन्हा सुस्थितीत आणण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

यावेळी जय शिवराय म्हणत गडाच्या या ढासळलेल्या बुरुजाची सह्याद्री प्रतिष्ठाण हिंदुस्थानाकडून मोहीम फत्ते करण्यात आली. एकीकडे मुसळधार पाऊस कोसळत असताना या दुर्गसेवकांनी हाती घेतलेली मोहीम चोख बजावत पुन्हा एकदा गड किल्ल्यांचे वैभव बाधीत ठेवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यानिमित्ताने कर्जत विभागातील दुर्गसेवकांनी हाती घेतलेल्या या मोहिमेमुळे शेकडो दुर्गसेवक एकत्र आले होते.

कर्जत तालुक्यात मागील आठवड्यापासून सुरू झालेल्या जोरदार पावसामुळे कोथळीगड (पेठचा किल्ला) येथील बुरुजाचा काही भाग ढासळला होता. सध्या पुरातत्त्वीय विभागाकडून गड-किल्ल्यांकडे होत असलेले दुर्लक्षामुळे या किल्ल्याची सुद्धा दुरवस्था होत चाललेली. त्यामुळे येथील महत्व लक्षात घेता सह्याद्री प्रतिष्ठाणच्या दुर्गसेवकांनी तात्काळ दुर्गसंवर्धन मोहीम आयोजित करून रविवारी (दि.१४) सह्याद्री प्रतिष्ठाण हिंदुस्थान कर्जत विभागाने मोहीम आखली. या माहिमेला कर्जतच्या दुर्गसेवक यांच्या बरोबरच पेण, पनवेल, मुंबई, अंबरनाथ येथील दुर्गसेवकांची उपस्थिती लाभली. यावेळी शेकडोने उपस्थित झालेल्या दुर्गसेवकांनी ही मोहीम फत्ते केली आहे.

मोहिमेच्या सुरवातीला गडपूजन करून बुरुजाची ढासळलेला माती आणि दगडांचा भाग व्यवस्थित पुन्हा वापरता येईल अशा पद्धतीने रचून ठेवण्यात आला, जेणेकरून पुन्हा पावसामुळे कुठले नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात आली. दरम्यान, यावेळी गडावर सह्याद्री प्रतिष्ठाणच्या माध्यमातून बसवलेले दरवाजे व तोफगाडे यांची शाकारणी करून अतिरिक्त वाढलेले गवत काढून टाकण्यात आले. तर, पावसाळा संपताच डागडुजी करण्याचा निर्धार सुद्धा यावेळेस सह्याद्री प्रतिष्ठान कर्जत विभागाकडून करण्यात आला आहे. या मोहिमेचे नेतृत्व कर्जत विभागातील दुर्गसेवक सुरज खडे, भुषण बेलोसे, निरंजन ठाणगे, रितेश वायकर, हरेश मते, मिथिलेश म्हामुणकर, विनायक मराडे, प्रणव जंगम, रोहन म्हामुणकर, मयुर मते, अक्षय मते, सचिन धुळे, गणेश जाधव, अतुल घरत, समिर मराडे यांनी केले.

किल्ल्याचा शस्त्र साठ्यासाठी उपयोग

कोथळीगड हा मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील नेरळच्या पूर्व दिशेला १९ किलोमीटरवर आणि कर्जतच्या ईशान्येला २२ किलोमीटरवर असलेल्या पेठ अंबिवली पुढे एका सुळक्यावर हा आहे. कोथळीगड किल्ला छोटा असून पायथ्याची गुहा मोठी आहे. गुहेचे खांब मूळ पाषाणातून कोरून काढलेले आहेत शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्याचा उपयोग शस्त्रांचा साठा ठेवण्यास करत असत.

चिखलातली मस्ती

राज्य विधिमंडळाचे अधिवेशन गेल्या आठवड्यात संपले. अखेरच्या दिवशी आपल्या भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य सरकारकडे पैशांना तोटा नसल्याचे सांगितले. क्रिकेट विश्वचषक स्पर्धा जिंकलेल्या संघाला अकरा कोटी रुपये देण्याच्या निर्णयाबाबत सरकारवर विरोधकांनी टीका केली होती. बीसीसीआयने क्रिकेटपटूंना आधीच १२५ कोटी रुपयांची बक्षिसे दिलेली आहेत. शिवाय, एरवीही त्यांना रग्गड मानधन व इतर फायदे मिळत असतात. असे असताना केवळ एक स्पर्धा जिंकली म्हणून देशाच्या संघाला महाराष्ट्र सरकारने पैसे देण्याची काहीच गरज नव्हती. पण आम्ही याच स्तंभात आधी म्हटल्याप्रमाणे पैसे झाडाला लागतात असा शिंदे सरकारचा समज आहे. विधानभवनाच्या आवारात लोकांचे खिसे झाडले तरी अकरा कोटी रुपये जमा होतील असे शिंदे म्हणाले व खेळाडूंचा सन्मान करण्यात गैर काय असा सवाल त्यांनी केला. पण प्रश्न खेळाडूंच्या गौरवाचा नव्हे तर राज्य सरकारकडच्या पैशांचा आहे. एक खरे की, महायुतीच्या नेत्यांचे कपडे झाडले तर अकराच काय, अकराशे कोटी रुपयेही निघू शकतील. विविध पक्षांमधून निघालेले गद्दार पेटी नव्हे तर खोक्याच्या हिशेबातच बोलतात असे म्हणतात. गेल्याच आठवड्यातल्या विधानपरिषद निवडणुकीत त्याचा प्रत्यय आलाच. भाजप, शिंदे किंवा पवार गटापैकी कोणाकडेही आपल्या उमेदवारांना पुरतील इतकी मते नव्हती. तरीही ते जिंकले. आता जणू विधानसभेतच बाजी मारल्यासारखा जल्लोष सुरू आहे. महायुतीच्या नेत्यांमध्ये हिंमत असेल तर बाहेरून आलेल्या एकेका मतासाठी किती खिसे झाडावे लागले याची माहिती त्यांनी उघड करावी. भाजप, शिंदे आणि अजितदादांनी गेल्या दोन वर्षात न्याय, नीती, संकेत यांची कसलीही चाड बाळगलेली नाही. त्यांच्या सत्तेच्या हव्यासाने राज्याच्या राजकारणाचा चिखल झाला आहे. सत्तेचा माज आलेले काही मस्तवाल रेडे या चिखलात नाचत आहेत. पण मांजर डोळे मिटून दूध प्यायली तरी तिची पापे जगाला दिसत असतातच. योग्य वेळी त्यांचा हिशेब होतोच.

तिजोरीची लुटालूट

लाडकी बहीणसारख्या योजनांमुळे राज्य सरकारवर मोठा बोजा येणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पाच्या जोडीनेच ९५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या अजितदादांना मांडाव्या लागल्या. आता तर कॅग या सरकारी ऑडिटरच्या अहवालातही या प्रवृत्तीवर कडक ताशेरे मारले आहेत. राज्य सरकारने वास्तवाचे भान राखून अर्थसंकल्प मांडावेत असे त्यात म्हटले आहे. पण शिंदे, दादा आणि मंडळी (म्हणजे देवेंद्रांचा भाजप) येती विधानसभा जिंकण्यासाठी कोणत्याही थराला जायला तयार होईल हे स्पष्ट आहे. तीन तीन पक्षांची ताकद लावून महायुतीचा हा अडाण्याचा गाडा खेचण्याचा प्रयत्न झाला. पण जनतेने लोकसभेला त्यांचे टायरच पंक्चर केले. आता, लोकांवर वाटेल तसे पैसे उधळून त्यांना वश करण्याचा प्रयत्न चालू आहे. गरीब महिलांना महिना दीड हजार रुपये देणाऱ्या योजनेची जाहिरात अशी काही चालू आहे की प्रत्येक महिलेलाच जणू पन्नास हजार रुपये दिले जाणार आहेत. या योजनेसाठी पात्र होण्याकरिता बऱ्याच अटी घालण्यात आल्या आहेत. त्यामध्ये बसणे हे सोपे जाणार नाही. योजनेसाठी गर्दी करणाऱ्या राज्यभरातील महिलांनाही हे लवकरच कळेल. किंवा मग त्यात भयंकर भ्रष्टाचार होईल. भाजपपासून प्रेरणा घेऊन शिंदे आणि अजितदादांनी आता शे-पन्नास जाहिरात कंपन्या भाड्याने घेतल्या आहेत. सोशल मिडिया व टीव्हीवरच्या प्रसिध्दीमध्ये जनतेला बुडवून टाकायचे हे त्यांचे धोरण आहे. वास्तविक, हे धोरण नुकतेच तोंडावर आपटले आहे. मोदींची गॅरंटी, आदित्यनाथांचा विकास आणि शिंदे सरकारच्या योजना यांच्या तुफान जाहिराती लोकसभेपूर्वी सहा महिने आधीपासून वृत्तपत्रे, टीव्ही व सोशल मिडियात चालू होत्या. पण तरीही खुद्द उत्तर प्रदेशात सुमारे ३५ जागा कमी झाल्या आणि महाराष्ट्रात मतदारांनी यांचे तोंड फोडले. वाराणसीत मोदींचे मताधिक्य कमी झाले. हरियाणा, पंजाब, बंगाल इथे भाजप भुईसपाट झाली. कालपरवाच झालेल्या पोटनिवडणुकांमध्येही महायुतीला सणसणीत मार पडला आहे. तरीही यांची अक्कल ताळ्यावर आलेली नाही.

खिरापत आणि खंडणी

शिंदे सरकारने आता नेमाने वारी करणाऱ्या वारकऱ्यांना पेन्शन सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी वारकरी महामंडळ स्थापण्यात येणार आहे. जनतेला आणि आपल्या कार्यकर्त्यांना खिरापत वाटण्याचा हा आणखी एक प्रकार आहे. सत्तेची तिजोरी हातात आहे म्हणून शिंदे सरकारने ही जी काही उधळपट्टी चालवली आहे ती निव्वळ गुन्हेगारी स्वरुपाची आहे. शेतकरी किंवा कष्टकरी मंडळींना पेन्शन देण्यामागचे तत्व कळू शकते. रोजच्या उत्पन्नातून दोन पैसे बाजूला काढून ठेवण्याइतकी पैशांची सवड त्यांना कधीच मिळत नाही. तसे होण्याला आपली भांडवली अर्थव्यवस्था आणि सरकारची धोरणे कारणीभूत आहेत. त्यामुळे त्यांना साठीनंतर थोडे वेतन देणे ही सरकारची जबाबदारीच म्हणायला हवी. वारकऱ्यांच्या बाबत मात्र असे म्हणता येणार नाही. वारकऱ्याची माळ धारण करणे हा प्रत्येकाचा खासगी मामला असतो. विठ्ठलाच्या भक्तीभावामधून ती ते घालतात. सरकारने त्यांच्या येण्याजाण्यासाठी सुखसुविधा द्याव्यात, पंढरपुरात दर्शन सुलभ करावे. मात्र त्यांना निवृत्तीवेतन देणे हे कोणत्याच रीतीने समजण्यासारखे नाही. योजनेचे निकष ठरवणे व ती अंमलात आणणे हे अत्यंत कठीण होईल. म्हणजेच त्यात प्रचंड भ्रष्टाचाराला वाव राहील. सत्ताधारी मंडळींच्या जवळ असलेले त्याचा फायदा उपटतील. लोकांना निव्वळ लाचार बनवतील. वास्तविक, आजवर, वारकरी हा अध्यात ना मध्यात असा आनंदी समुदाय होता. त्याने ना कधी कशाची मागणी केली ना अपेक्षा धरली. पंढरीच्या वाळवंटात आनंदाने नाचणारी ही मंडळी आहेत. पण शिंदे सरकार त्यांना आपल्यासोबतच राजकारणाच्या चिखलात ओढून तिथे नाचायला लावू पाहत आहे. सर्वधर्मीय गरीब ज्येष्ठ नागरिकांना फुकट तीर्थयात्रा घडवून आणण्याची एक योजनाही शिंदे यांनी जाहीर केली आहे. तीदेखील याच प्रकारची आहे. यातही पर्यटन कंपन्या आणि काही कंत्राटदारांचे उखळ पांढरे होणार आहे. सरकारी तिजोरीतील पैसा उधळून भोळ्याभाबड्या जनतेची मते वसूल करणे म्हणजे हा एक अट्टल असा दरोडाच आहे.

विचार

बांधकामे कोसळतात की नीतीमत्ता?

देशात वेगाने विकासकामे होत आहेत यात शंका नाही. मात्र सुरू असलेल्या वा नुकत्याच पूर्ण झालेल्या बांधकामांचा दर्जा योग्य आहे की नाही हे बघणे गरजेचे आहे. अलिकडे काही विमानतळांच्या बाहेरच्या बाजूचे छत कोसळण्याच्या घटना समोर आल्या. पुलांचे उद्घाटन झाल्यानंतर काही दिवसांमध्येच ते पडल्याच्या घटनाही आपण पाहिल्या. रस्ते खचणे तर नित्याची बाब आहे. याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

देशातील पायाभूत सुविधांमध्ये वेगाने सुधारणा होत असल्यामुळे आपण विकसनशील अवस्थेकडून विकसित अवस्थेकडे वेगाने निघालो असल्याचे स्पष्ट होते. हमरस्त्यांचे वाढते प्रमाण, वेगाने विस्तारणारी दळणवळण यंत्रणा, प्रवासाचा वेळ आणि इंधनाची बचत करणारे नवे मार्ग ही वा यासारखी विकासकामे देशाचेच नव्हे तर जगाचे लक्ष वेधून घेणारी आहेत. समुद्राखालूनच रस्ते असो वा सर्वात उंचावरील जाणारी रेल्वे असो, देशाने अशा सर्व कामांद्वारे एक महत्त्वपूर्ण मजल मारली असल्याचे नाकारुन चालणार नाही. मात्र एकीकडे हे सकारात्मक चित्र असताना महामार्गांवरील वाढते अपघात, त्यात होणारी जीवित हानी, शहरे जोडली जात असताना गावखेड्यांतील रस्त्यांची कमालीची दुरवस्था, रस्त्यांचा निकृष्ट दर्जा आणि त्यात राहिलेल्या असंख्य त्रुटीदेखील दुर्लक्षून चालणार नाहीत. अलिकडेच दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल एकच्या छपराचा भाग कोसळून एकाचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले. महत्त्वाचे म्हणजे ही दुर्घटना घडण्याआधी काही दिवसांपूर्वीच टर्मिनलचे काम पूर्ण झाले होते. या अपघातानंतर बांधकामाच्या दर्जाकडे दुर्लक्ष झाले असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. अर्थातच ही एकमेव घटना नाही. गेल्या काही वर्षांमध्ये देशात ठिकठिकाणी उभे राहणारे, सर्वसामान्यांसाठी सुरू झालेले अनेक पायाभूत प्रकल्प पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळत आहेत. त्यामुळे सामान्य भारतीयांच्या जीवाला काही किंमत उरली आहे की नाही, असा प्रश्न उभा राहतो.

ताज्या चर्चेचे कारण म्हणजे देशात नव्याने उद्घाटन झालेल्या विमानतळांचे भाग कोसळण्याच्या घटना समोर आल्या. दिल्लीतील घटनेच्या एक दिवस आधीच नव्याने उद्घाटन झालेल्या जबलपूर विमानतळाच्या छताचा काही भाग कोसळला. हे छप्पर एका सरकारी अधिकाऱ्याच्या गाडीवर कोसळले. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. दिल्लीतील घटनेच्या पुढच्या दिवशी राजकोट विमानतळा बाहेरच्या छताचा भाग कोसळला. या विमानतळाचे उद्घाटनही मागील वर्षीच झाले होते. या तिन्ही घटना उत्तर भारतात गेले काही दिवस कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे घडल्याचे सांगण्यात आले. यापूर्वी मार्चमध्ये गुवाहाटीच्या विमानतळाच्या छताचा काही भाग कोसळला होता. हे विमानतळ अदानी समुहाच्या नियंत्रणाखाली होते. थोडक्यात, नव्याने उभारलेल्या या सर्व संरचनांना मोठ्या प्रमाणात पडलेला पाऊस पेलता आला नाही, हे वास्तव आहे. पण लक्षात घेण्याजोगी अन्य बाब म्हणजे अलिकडच्या काळात पावसाचे गणित बदलताना दिसत आहे. काही दिवसांमध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस पडल्याचे चित्र बघायला मिळत आहे. देशातील अनेक भागांमध्ये ढगफुटीसदृश पाऊसही पडताना दिसतोय. थोडक्यात, कमी वेळात अतितीव्र पाऊस बघायला मिळत आहे. असे असताना नवी बांधकामात वा जुन्या वास्तूंची डागडुजी करताना ही बाब का लक्षात घेतली जात नाही, हा प्रश्न उरतो. अशा प्रकारच्या दुर्घटना केवळ विमानतळांपुरत्याच मर्यादित नाहीत. भारतात मोठा गाजावाजा करत जी-२० देशांची शिखर परिषद भरवण्यात आली होती. त्यासाठी तयार करण्यात आलेल्या भारत मंडपम् या ठिकाणी एका दिवसातील जोरदार पावसामुळे खूप पाणी साठले होते. दुसरीकडे अयोध्येत नव्याने बांधलेले भव्य आणि प्रशस्त राममंदिरही पाणी साचल्याच्या बातमीमुळे चर्चेत आले. खरे तर केंद्र सरकारचा हा सर्वात महत्त्वाकांक्षी आणि लक्षवेधी प्रकल्प होता. जानेवारीमध्ये मोठा गाजावाजा करत मंदिराचे उद्घाटन झाले. सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी हा मुहूर्त साधत अद्याप निर्माणाधीन अवस्थेतील मंदिरात रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा केली गेली. बालरुपातील रामरायांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांचे जत्थे अयोध्येची वाट तुडवू लागले मात्र आता अयोध्येमध्ये पाणी साचत असून रस्त्यांमध्ये खड्डे वाढत आहेत. तिथे नव्याने बांधलेले बरेच रस्तेही पावसामुळे खचू लागले आहेत.

उर्मिला राजोपाध्ये

महाराष्ट्रातील भाजपा सरकारने पुणे-मुंबईतील मेट्रो प्रकल्प आपल्या कर्तृत्वाच्या खुणा म्हणून मिरवले. मात्र या दोन्ही शहरांमध्ये पहिल्याच पावसात मेट्रोच्या बांधकामाचा निकृष्ट दर्जा समोर आला. पावसाचे प्रमाण वाढताच पुण्यातील मेट्रो स्थानकामध्ये गळती बघायला मिळाली. गेल्या वर्षी मुंबईतील दोन मेट्रो स्थानकांमध्ये पाण्याची गणती झाल्याचे सर्वांना माहिती आहे. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने सहा कंत्राटदारांना एक कोटी ३३ लाखांचा दंड आकारल्याचीही बरीच चर्चा झाली होती. मात्र तरीही स्थिती सावरल्याचे चित्र दिसले नाही. अर्थातच ही गळती मेट्रो स्थानके, विमानतळे, मंदिरे यापुरती मर्यादित नाही. भारत सरकारने बांधलेल्या अनेक धरणांनादेखील वेळोवेळी या समस्यांचा सामना करावा लागत आहे. निश्चितच ही बाब अनेक पटींनी गंभीर बनू शकते. गेल्या वर्षी केंद्र सरकारचा सिक्कीममधला धरण प्रकल्प पाण्याच्या दाबामुळे वाहून गेला आणि त्या साखळीतल्या अनेक धरणांचे नुकसान झाले. भूस्खलन, बांधकामावेळी झालेला हलगर्जीपणा यामुळे देशातील अनेक धरणांवर अपघात पहायला मिळाले. १२ नोव्हेंबर २०२४ या दिवशी उत्तराखंडमध्ये चारधाम महामार्गाचा भाग म्हणून तयार केल्या जात असलेल्या बोगद्याचा आतला भाग कोसळला आणि जवळपास ४१ कामगार तब्बल १७ दिवस आतमध्ये अडकून पडले. तज्ज्ञांच्या समितीने केलेल्या अभ्यासात हा बोगदा तयार करण्यासाठी आवश्यक भूतांत्रिक आणि भूभौतिक परीक्षणच करण्यात आले नव्हते, असे समोर आले. खेरीज कामाच्या ठिकाणी सुरक्षेची वा आप्तकालिन संकटातून बाहेर पडण्याची कोणतीही यंत्रणा उभारण्यात आली नव्हती. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर समोर आलेल्या निवडणूक रोख्यांच्या माहितीतून या बोगद्याचे काम करणाऱ्या नवयुग कन्स्ट्रक्शन लिमिटेड या कंपनीने भाजपला निवडणूक रोख्यांमार्फत मोठी देणगी दिल्याचे समोर आले. ही बाब पुरेशी बोलकी आणि सद्यस्थितीवर भाष्य करणारी आहे. अशाच प्रकारे देशातील अनेक कंपन्यांनी आपापल्या राज्यातील निवडणुकांपूर्वी निवडणूक रोख्यांमार्फत राजकीय पक्षांना मोठ्या प्रमाणावर देणग्या दिल्याचे समोर आले आहे. त्यांनी उभारलेल्या अनेक प्रकल्पांमध्ये आढळलेली अनियमिता, झालेले अपघात यामुळे आता सर्वच प्रकल्पांच्या सुरक्षेवर प्रश्न उपस्थित होताना दिसत आहेत. खरे पाहता पूल हे देशात निर्माण होणाऱ्या संरचनापैकी एक महत्त्वाचा घटक असतात. पण देशभरात नव्याने बांधलेले वा डागडुजी न झालेले पूल पडण्याचे प्रमाणही बरेच मोठे आहे. त्यात बिहार प्रथम क्रमांकावर आहे. तिथे गेल्या वर्षात नव्याने बांधलेले १३ पूल पडले. त्यातही १९ ते २९ जून या कालावधीत म्हणजेच अवघ्या दहा दिवसांच्या काळात तब्बल पाच पूल कोसळले. सातत्याने कोसळणाऱ्या पुलांबाबत बिहारचा इतिहास बराच वाईट आहे. बिहारमध्ये २०२१ मध्ये आठ पूल पडले. त्याआधी म्हणजेच २०२० मध्ये नऊ पूल पडले होते. २०२२ मध्येही या राज्यात आठ पूल पडले तर २०२३ मध्ये नऊ पूल पडले. २०२४ मध्ये पहिल्या सहा महिन्यांमध्येच आतापर्यंत सहा पूल पडण्याच्या घटना घडल्या आहेत. आता यातील किती जुने होते वा किती नवे होते याची पुरेशी माहिती उपलब्ध नसली तरी यातील बहुतांश पूल नवे असल्याचे बोलले जात आहे. यातील काही पूल उद्घाटनानंतर अवघ्या महिनाभरातच कोसळले. त्यातील काही पूल तर निर्माणाधीन अवस्थेतच पडले.

एक पूल बांधण्यासाठी किती कोटींचा खर्च येतो, हे आता सर्वसामान्य जनताही जाणते. हा सर्व निधी त्यांनी दिलेल्या करुपी महसुलातूनच खर्च होत असतो. त्यामुळेच अशी प्रत्येक घटना त्यांच्या जीवाबरोबरच सामान्यांच्या पैशांचाही खेळखंडोबा करत असतात. अशा घटनांमध्ये हजारो कोटी रुपये पाण्यात जातात. त्यात होणारी जीवितहानी तर अधिक गंभीर बाब ठरते. भारतात पूल पडल्यामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण इतर कोणत्याही देशात होणाऱ्या प्रमाणापेक्षा २५ टक्क्यांनी जास्त आहे. आजही देशात ब्रिटिशांनी बांधलेले काही पूल बदलत्या वातावरणाचा, ऋतूचक्राचा सामना करत खंबीरपणे उभे आहेत. आजही त्यांना साधा तडा गेल्याचे दिसत नाही. असे असताना अलिकडे बांधलेले पूल ढासळणे ही नामुष्कीची आणि भ्रष्ट यंत्रणेचे दाखले देणारी बाब म्हणावी लागेल. याबाबत गांभीर्याने विचार होणे आणि प्रकल्पांच्या उभारणीत नीतीमत्तेलाच धक्का बसणे थांबायला हवे.

आजकाल

हवं आहे आत्मसन्मानाने जगणं

सर्वच मुले मुली आपल्या आईवडिलांचे, आजी आजोबांचे; सर्वच मुले मुली आपल्या भावा बहिणींचे लाडके असतात.

पण यापैकी कोणीच आपल्या लाडक्या मुलामुलींना, नातवांना, भावा-बहिणींना ते प्रौढ झाले तरी कडेवर घेऊन फिरवत नाहीत.

किंवा त्यांना आयुष्यभर कडेवर घेऊन फिरवणे हाच ते लाडके/लाडक्या असण्याचे द्योतक आहे असे कोणी म्हणत नाही.

आपण ज्याचावर मनापासून प्रेम करतो ती व्यक्ती सर्वार्थाने स्वावलंबी व्हावी, आपल्यावर अवलंबून राहू नये, त्या व्यक्तिला आत्मसन्मानाने जगता यावे.

म्हणून सर्व आईवडिल, आजी आजोबा, भाऊ बहिण जीवाचे रान करतात.

लाडकी बहिण, लाडका भाऊ प्रौढ व्यक्ती आहेत, त्यांनी संसार थाटले आहेत तरी देखील त्यांना पॉकेट मनी सारख्या रकमा द्यायच्या. शेतीला लागणाऱ्या गोष्टी किफायतशीर भावात मिळतील, शेतीमालाला वाजवी किमती मिळतील, शेतीसाठी पायाभूत सुविधा गुंतवणुक केली जाईल आणि शेतकरी कालांतराने वित्तीय दृष्ट्या किमान स्वतःच्या मिळकतीवर जगू शकेल हे न पाहता दरवर्षी एक छोटी रक्कम त्याला द्यायची, अधून मधून थोडीफार कर्जमाफी जाहीर करायची. पण कोट्यावधी शेतकऱ्यांच्या शेती क्षेत्राच्या मूलभूत प्रश्नांना कधी हात घालायचा नाही.

संजीव चांदोरकर

शिक्षण क्षेत्रात सार्वजनिक पैसे न घालता, आहे त्या सरकारी शाळा महाविद्यालय विश्वविद्यालय कशी सुधारतील हे न बघता, विद्यार्थ्यांना कर्ज काढावे लागलेच तर त्यांना नोकरी मिळेल आणि त्या मिळकतीतून ते स्वतःहून कर्जाची परतफेड करू शकतील हे न बघता विद्यार्थ्यांना छोटी मोठी मदत द्यायची, छोटी कर्जमाफी द्यायची. विद्यार्थ्यांच्या तरुणांच्या मूलभूत प्रश्नांना कधीही हात घालायचं नाही.

स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षानंतर देखील आपल्या देशातील कोट्यावधी नागरिक एवढ्या वंचित अवस्थेमध्ये आहेत कि ते सतत शासनाच्या अगदी छोट्या मदतीकडे देखील डोळे लावून बसलेले असतात.

त्यातून त्यांच्या आत्मसन्मानाचा निखारा कधी फुलत नाही.

त्यांच्यात एक प्रकारची मिंधेपणाची भावना वर्षानुवर्ष रुजली जाते. रुजवली जाते.

माणसासारखे जगणे म्हणजे म्हणजे फक्त अर्धी मुर्धी भाकर मिळणे नव्हे, तर स्व कष्टाने ती मिळवणे, स्व कष्टाने आपल्या कच्या बच्याचे संगोपन करणे, हे सर्व करतांना छान वाटणे, आणि आयुष्यभर आत्मसन्मानाने जगणे म्हणजे माणसासारखे जगणे. शासनाची अर्थसंकल्पीय तूट वाढते असे कारणे देऊन शासनाच्या कल्याणकारी योजनांना विरोध करणारे नव उदारमतवादी साहित्य वाचा. ''माणसाचा आत्मसन्मान'' हा शब्द जरी त्या साहित्यात आढळला तर मला सांगा.

लाडक्या बहिणीने, भावांनी, शेतकऱ्यांनी विद्यार्थ्यांनी शासनाकडून मिळणारी सर्व मदत जरूर घ्यावी. कारण तो त्यांचाच, म्हणजे सार्वजनिक पैसा आहे.

पण आज ना उद्या आम्हाला तुमच्या मदतीची गरज लागणार नाही अशी धोरणे आखा हे देखील त्याच वेळी ठासून सांगावे.

मराठी साहित्यिक दिनविशेष

१६ जुलै

१८४४ :- निबंधकार, भाषांतरकार काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांचा जन्म. सरकारी शिक्षणखात्याच्या आदेशानुसार त्यांनी 'ज्योतिःशास्त्र', 'भूवर्णन', 'भूशास्त्र', 'वनस्पतिशास्त्र','रसायनशास्त्र' इत्यादी पुस्तके लिहिली. **१८७५:-** लेखक प्रा. नारायण दाजी लाड यांचे निधन. 'रसायनशास्त्र', 'औषधविद्या' या पुस्तकासह अनेक संशोधनात्मक लेख लिहिले. **१८९१:-** कवी, कथा-कादंबरीकार, संपादक देवदा नारायण टिळक यांचा जन्म. 'तीव्र जाणीव','छोटा संस्थानिक','कृ ष्णा','विनोद मूर्तीची पुण्यावर स्वारी' या कादंबऱ्यांसह 'पाऊलवाट' हा कथासंग्रह आणि 'बोधसुधा','जातककथा','वेणू वेडगावात', 'आपले मुके मित्र' हे बालसाहित्य याशिवाय लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रे' चे संपादन त्यांनी केले. 'ख्रिस्ती नागरिक','बालबोधमेव' या नियतकालिकांचे ते संपादक होते. 'बायबलची तोंडओळख','बायबलच्या मराठी भाषांतरीचे विहंगमापलोकन' ह्या पुस्तकांसह सुमारे पंधरा एक पुस्तकांचे त्यांनी संपादन केले. **१९१४:-** मराठी कथाकार, विचारवंत आणि स्वातंत्र्यसेनानी वामन चोरघडे यांचा जन्म १६ जुलै १९१४ रोजी झाला. पेशवाईतील साडेतीन शहाण्यापैकी एक पूर्ण शहाणे देवाजीपंत चोरघडे हे त्यांचे पूर्वज मराठी व अर्थशाख हे विषय घेऊन एम. ए. झाल्यावर प्राध्यापकी केली. पुढे नागपूरच्या जी.एम. क उपप्राचार्य होते. मिठांचा सत्याग्रह आणि छोडो भारत चळवळीत सहभा घेतल्याबद्दल त्यांना कारावास पत्करावा लागला होता. कारावासात असतानाते पूर्णपणे गांधीवादी बनले. ज्योत्स्ना प्रतिभा यातून त्यांनी सातत्याने कथा लिहिल्या. 'सुषमा' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यानंतर हवन यौवन, प्रस्थान, पाथेय, संस्कार, नागवेल, मजल, बेल, ख्याल, ओला दिवस असे अनेक कथासंग्रह प्रसिद्ध झाले. विविध प्रकृतींची माणसे त्यांच्या कथेतून भेटतात. **१९४६:-** तामीळ भाषेतील पदविका सन्मानित करणारे लेखक डॉ. उाम रुदवार यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'महाराष्ट्राचे वसंत वैभव','ज्ञानगंगेचा भगीरथ', 'आचार्य देवो भव!','सहकार सूर्य' ,'श्रीराम अप्पाजी आसेगांवकर','आजचे मराठी साहित्य', 'नवमहाराष्ट्राचे शिल्पकार' हे संपादित साहित्य आणि 'वसंतराव नाईक' हा त्यांचा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. **१९७४:-** अश्लीलताविरोधी मोहिमेचा विचार पायाशुध्द भुमिकेतून पुढे ठेवणारे लेखक दत्तात्रेय बळवंत गोडबोले यांचे निधन. 'अप्सरा' या शृंगारिक मासिकांवर फिर्याद दाखल करुन संपादकाला तुरुंगात धाडले. **१९८६:-** इतिहास संशोधनातील भीष्माचार्य अशी ओळख असणारे इतिहास वा. सी. बेंद्रे यांचे निधन. 'मालोजी राजांच्या सून ते ताराबाईपर्यंतचा इतिहास' त्यांनी आपल्या लेखणीतून साकारला. तब्बल २५ वर्षे 'छत्रपती संभाजी' या विषयावर संशोधन करुन त्यांचे चरित्र करुन संभाजी राजांची शोकात्मक नायक ही अन्य इतिहासकारांनी रंगवलेली प्रतिमा पुसून टाकण्यात ते यशस्वी ठरले. इंग्लंड व अन्य युरोपियन देशात जाऊन जवळजवळ २७ खंड तयार होतील एवढी कागदपत्रे त्यांनी मिळवली. त्यात शिवाजी महाराजांचे अस्सल चित्र त्यांना साले ते त्यांनी देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवले. **२०१४:-** ज्येष्ठ पत्रकार, लेखक यशवंत जोशी यांचे निधन. आकाश वाणीचे वृत्तनिवेदक दुरदर्शनचे वृत्तसंपादक पद भुषवणाऱ्या यशवंतरावांनी लालबहादुरशास्त्री यांच्या पत्नी ललिता शास्त्री यांचे 'माझे पती माझे दैवत' ह्या आठवणी वजा पुस्तकांखेरीज 'गार्धी गीता','पुराणातील कथा' ही पुस्तके लिहिली.



संजय वझरेकर
९९७५५७६६७५

लोकसंसद

भारताची लोकसंख्या १७० कोटींवर जाणार!

संयुक्त राष्ट्रांचा 'जागतिक लोकसंख्या संभावना २०२४' (वर्ल्ड पॉप्युलेशन प्रॉस्पेक्ट्स २०२४) हा अहवाल नुकताच प्रकाशित झाला. या अहवालानुसार सद्याची अंदाजे १४२ कोटी असलेली भारताची लोकसंख्या २०६० च्या दशकाच्या सुरुवातीला सुमारे १७० कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र त्यानंतर भारताची लोकसंख्या उतरणीला लागून शतकाच्या अखेरीस २१०० सालामध्ये १५ कोटीने कमी होईल. परंतु असे असले तरी गेल्या वर्षी लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकणारा भारत २१०० सालामध्ये जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश राहील. या अहवालानुसार २०२४ मध्ये चीन, जर्मनी, जपान आणि रशियासह अन्य ६३ देश आणि प्रदेशांमध्ये लोकसंख्या वाढली आहे. सध्याची जगाची ८२० कोटी असलेली लोकसंख्या येत्या ५०-६० वर्षांमध्ये वाढत जाणार असून २०८० च्या मध्यापर्यंत १०३० कोटी इतकी होणार आहे. 'जागतिक लोकसंख्या संभावना २०२४' ही संयुक्त राष्ट्रांची अठ्ठाविसावी आवृत्ती असून २३७ देशांतील लोकसंख्याशास्त्रीय कल पाहून आणि त्याचे विश्लेषण करून यात लोकसंख्या वाढीचे संभाव्य अंदाज वर्तविण्यात आले आहेत. तसेच या अहवालात अनेक देशांना त्यांच्या लोकसंख्येचा आकार ठरविण्यासाठी धोरणात्मक शिफारशी करण्यात आल्या आहेत.

- प्रदीप मोरे, अंधेरी

धनदांडगी प्रवृत्तीच कारणीभूत...

पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणानंतर वरळीतील कावेरी नाखवा या कोळी महिलेचा भरधाव कारने धडक देऊन फरफटत नेल्यामुळे झालेल्या मृत्यु प्रकरणातील साम्य म्हणजे यात अपघाती मृत्युस कारणीभूत ठरलेले धनदांडगेच होत. दोन्ही प्रकरणातील आरोपींना वाचवण्यासाठी कायद्यातील पळवाटांचा पूरेपर वापर करुन घेण्यात आला. वरळी अपघात प्रकरणात तर तीन दिवस आरोपी भूमिगत केला गेला. त्यामुळे त्याच्या रक्तातील मद्यांश निघून जायला मदतच झाली किंबहुना तोच मूळ हेतू होता. ही दोन प्रकरणे गाजत असतानाच बनावट आर्थिक प्रमाणपत्र व बनावट दृष्टीदोष प्रमाणपत्राचा वापर करुन प्रशिक्षणार्थी प्रशासकीय अधिकारीपद मिळवलेल्या पूजा खेडेकर या युवतीचे प्रकरण सध्या चर्चेत आहे. याही प्रकरणाच्या मुळाशी धनदांडगी प्रवृत्तीच आहे असे म्हणायला बराच वाव आहे. सत्ता आणि पैसा हाताशी असला की धनदांडगे आपल्याला हवे तसे करु शकतात असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आणि बऱ्याचशा प्रकरणात तसे दिसूनही आलेले आहे.

- दीपक काशिराम गुंडये, वरळी.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ जुलै

१) श्रीम.अनघा अनिल मराठे
वरसोली, अलिबाग, १६-७-१९६२

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

उरणकरांना वाहतूक कोंडीचे ग्रहण

विद्यार्थी, पालकांबरोबर जनताही हैराण; शाळा सुटण्याच्यावेळी पोलीस तैनात ठेवण्याची मागणी

। उरण । वार्ताहर ।

उरण शहरात गेली अनेक वर्षांपासून वाहतूक कोंडीची समस्या आ वासून उभी आहे. या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजनाच होत नसल्याने दररोज उरण शहरात महत्त्वाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचे पहावयास मिळत आहे. या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करून ही समस्या त्वरित सोडवावी, अशी मागणी उरणमधील जनतेने केली आहे.

सदरची वाहतूक कोंडी ही प्रामुख्याने रस्त्यावर अनधिकृत पार्किंग व वैष्णवी हॉटेलजवळ असलेल्या बेकायदेशीर पार्किंग झोन कारणीभूत ठरत आहे. तसेच नगरपालिकेने पार्किंगचे भूखंड बिल्डरांना विकले असल्याचे वाहनचालक सांगतात.

सध्या सर्वत्र शाळा महाविद्यालये सुरु झाली आहेत. या शाळांतील विद्यार्थी तसेच विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी व शाळा सुटल्यानंतर घरी नेण्यासाठी पालकही मोठ्या संख्येने येत असतात. ग्रामीण भागातून बाजारासाठी शहरात येणाऱ्या नागरिकांचीही संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. प्रत्येकजण शहरात टू व्हीलर, फोर व्हीलर घेऊन येत आहेत.

याची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. उरण शहरात पार्किंगची पाहिजे तशी योग्य सुविधा, जागा नसल्याने याचे दुष्परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. नगरपालिका हद्दीत जे पार्किंग भूखंड होते, ते सत्ताधाऱ्यांनी बिल्डरांच्या घशात घातल्याने ही समस्या उभी राहिली असल्याची चर्चा जनतेत सुरू आहे.

नियमबाह्यपणे वाहने पार्किंग करणाऱ्यांवर तसेच रस्त्यावर वेडी वाकडी वाहने लावणाऱ्यांवर उरण नगर परिषद किंवा पोलीस प्रशासनाच्या वाहतूक विभागातर्फे कोणतीही कायदेशीर कारवाई होत नसल्याने अवैध वा बेकायदेशीर पार्किंगला व वाहतूक कोंडीला प्रोत्साहन मिळत आहे. प्रशासनाने या सर्व समस्या लक्षात घेऊन उरण शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करावी, अशी मागणी उरण शहरातील जनतेने केली आहे.

उरण शहरातील वाहतूक कोंडीची ठिकाणे प्रामुख्याने उरण चारफाटा, आनंदनगर, पालवी हॉस्पिटल, राजपाल नाका, कोटनाका, गणपती चौक, स्वामी विवेकानंद चौक, पेन्शनर्स पार्क, वाणी आळी, तहसील कार्यालय आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होताना दिसते. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करुन नागरिकांना दिलासा देणे गरजेचे आहे.

पाच मिनिटांसाठी अर्धा तास

जिथे पाच मिनिटात पोहोचायला पाहिजे तिथे अर्धा ते एक तास लागत आहेत. पार्किंगसाठी योग्य नियोजन नसल्याने वाहतूक कोंडी होत आहे. शिवाय, अनेक दुकाने, टपरी, हातगाड्या रस्त्यावर येत आहेत. दुकानदार दुकानातील सामान रस्त्यावर ठेवत असल्याने रस्ता त्या सामानाने भरुन जातो. शिवाय, उरण शहरातील सर्वच रस्त्यावर भाजीपाला, व फळ विक्रेते, विविध वस्तू विक्रेते, हातगाडीवाले यांनी बेकायदेशीर अतिक्रमण केल्याने उरणमधील नागरिकांना मोकळा श्वास घेणे कठीण झाले आहे.

पोलीस बंदोबस्ताची गरज

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शाळा सुटण्याच्यावेळी तरी अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात यावी. तसेच वाहतूक कोंडीच्या ठिकाणी वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात यावी. विद्यार्थी, पालकांची मागणी आहे.

सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा

। उरण । वार्ताहर ।

सारडे विकास मंच अध्यक्ष तसेच कोमनादेवी ऑक्सिजन पार्कचे निर्माते नागेंद्र म्हात्रे यांचा वाढदिवस मित्र परिवारातर्फे साजरा करण्यात आला. यामध्ये श्रावणी सोमवार आरती समूह आवरे निवास गावंड आणि विराट पाटीलतर्फे मर्दनगड येथे वृक्षारोपण केले. राजिप शाळा आवरे येथे आयजीएल कंपनीतर्फे दोन घड्याळ देण्यात आले. तसेच मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

राजिप शाळा पाले येथे उपेंद्र ठाकूर यांच्यातर्फे ४१ विद्यार्थ्यांना ओळखपत्र आणि खाऊ वाटप करुन राजिप शाळा गोवठणे आणि पुनाडे आदिवासी वाडी येथे सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठान उरणतर्फे खाऊ वाटप करण्यात आले. राजिप शाळा सारडे येथे एयजीएल कंपनीतर्फे सहा घड्याळ, एक फॅन व खाऊ दिला. राजिप शाळा चांदायले वाडी रानसई येथे प्रवीण पाटील यांच्यातर्फे मुलांना जेवण आणि खाऊ वाटप, राजिप शाळा चिरनेर अक्कादेवी वाडी सन्नी बोरसे यांच्यातर्फे जेवण, फॅन आणि खाऊ वाटप करण्यात आला. सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठानचे हरिश्चंद्र म्हात्रे, संतोष जोशी, कामेश्वर म्हात्रे, विजय म्हात्रे, प्रदीप वर्तक, मिलन पाटील या सहकारी वर्गांच्या सहकार्याने नागेंद्र म्हात्रे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सर्व सहकारी वर्गाने किशोर पाटील प्रस्तुत 'स्वर हे माझे' संगीत कार्यक्रमाचे आयोजन हॉटेल एमडीएस सारडे येथे केले होते.

१६ जुलै रोजी शिवसंवाद मेळावा

। उरण । वार्ताहर ।

युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे हे मंगळवारी १६ जुलै रोजी उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसंवाद मेळाव्यासाठी उरणमध्ये येत आहेत. हा मेळावा जेएनपीटी टाऊनशिपच्या मल्टीपर्पज हॉलमध्ये होणार आहे. त्यांच्या या शिवसंवाद मेळाव्याच्या आयोजनासाठी शिवसेना उरण तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक शिवसेना जिल्हाप्रमुख व माजी आमदार मनोहर भोईर यांच्या संपर्क कार्यालयात पार पडली.

या बैठकीमध्ये मनोहर भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर व तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांनी सर्व शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. या बैठकीला माजी सभापती विश्वास म्हात्रे, उप तालुका प्रमुख जयवंत पाटील, उप तालुका संघटक रुपेश पाटील, अमित भगत, के. एम. घरत, शहर संपर्क प्रमुख गणेश म्हात्रे, शहर प्रमुख विनोद म्हात्रे, विभागप्रमुख एस. के. पुरो, द्रोणागिरी शहर संघटक किसन म्हात्रे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रकल्पग्रस्तांच्या पदरी निराशा

गेल्या १४ वर्षांपासून हजारो पीडित भूखंडापासून वंचित

। नवी मुंबई । वार्ताहर।

उरण-द्रोणागिरी परिसरातील हजारो प्रकल्पग्रस्त मागील १४ वर्षांपासून सिडकोच्या साडेबारा टक्के भूखंड योजनेपासून वंचित राहिले आहेत. ज्यांच्या जमिनी घेतल्या त्यांना भूखंड देण्यासाठी जमीनच शिल्लक नसल्याचे कारण सिडकोकडून दिले जात आहे. असंपादित जमिनीचे संपादन करून साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप करू, असे मागील पाच वर्षांपासून सांगणारे सिडकोचे अधिकारी प्रकल्पग्रस्तांच्या तोंडाला पाने पुसत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

एकीकडे राजकीय वरदहस्त लाभलेल्या सरकारी नोकर गृहनिर्माण सोसायटीच्या सभासदांची व वारसांची शहानिशा न करता, त्या सोसायटीला हजारो कोटी रुपये किंमतीचा भूखंड सिडको डोळे झाकून देत आहे. मात्र ज्यांच्या जमिनीवर नवी मुंबई शहर वसले आहे, त्या प्रकल्पग्रस्तांना मात्र भूखंड देण्यास सिडकोकडून टाळाटाळ केली जात आहे.

साडेबारा टक्के योजनेअंतर्गत भूखंडाच्या प्रतीक्षेत असलेल्या उरण-द्रोणागिरी परिसरातील ५७५ प्रकल्पग्रस्तांना सिडकोने १४ वर्षांपूर्वी भूखंड देण्याचे निश्चित केले होते. परंतु या जमिनीचा प्रत्यक्ष ताबा सिडको प्रकल्पग्रस्तांना देऊ शकली नाही. कारण जमिनीची शहानिशा न करताच सिडकोने सीआरझेडसह अतिक्रमण, नाले, खारफुटी व तलाव असलेल्या जागांवर प्रकल्पग्रस्तांसाठी भूखंड देण्याचे ठरवले होते. त्यामुळे १४ वर्षांपासून प्रकल्पग्रस्त भूखंड मिळण्याच्या प्रतीक्षेतच आहेत.

गतवर्षी पावसाळी अधिवेशनात द्रोणागिरी-उरणमधील सिडको प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के योजनेअंतर्गत ३२.४२ हेक्टर जमिनीचे वाटप सहा महिन्यांत करण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली होती. मात्र त्यांची घोषणा हवेतच विरली असल्याचे दिसून येते.

कार गेली खड्ड्यात

नवीन पनवेल : पनवेलकडून नेरेच्या दिशेने जाणारी चार चाकी कार चिपळे-विहिघर जवळील खड्ड्यात कलंडल्याची घटना नुकतीच घडली. सुदैवाने ही कार पलटी झाली नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु असल्याने पर्यटक मोठ्या प्रमाणात नेरे, गाढेश्वर परिसरात फिरण्यासाठी येतात. येथे वाहनांची मोठी रांग या रस्त्यावर लागलेली असते. दुपारी एकच्या सुमारास विहीघरच्या पुढे कार आली असता एका रिक्षाला वाचवण्याचा प्रयत्न करताना या कारवरील चालकाचा ताबा सुटला. त्यानंतर ती कार रस्त्याच्या बाजूला कलंडली. या कारमधून तिघेजण प्रवास करत होते. ते किरकोळ जखमी झाले.

चार शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप

लाईट ऑफ लाईफ संस्थेचा पुढाकार

। उरण । वार्ताहर ।

लाईट ऑफ लाईफ आणि जेएनपीए व अमेया लॉजिस्टिक्स उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण विभागातील सुमारे ६०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

द्रोणगिरी हायस्कूल करंजा, स्वातंत्रवीर सावरकर विद्यालय नवीन शेवे आणि प्रभाकर नारायण पाटील विद्यालय मोठी जुई ह्या ३ शाळांमध्ये ८ वी ते १० वी च्या प्रत्येक विद्यार्थ्यास १२ वह्या, १ कंपास बॉक्स, चित्रकला वही व आलेख वही इ. शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तसेच तिन्ही शाळांमध्ये ८ वी ते १० वी चा संपूर्ण अभ्यासक्रम असलेला इ लार्निंग किट, मिनी प्रोजेक्टरही देण्यात आला. तसेच कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन शाळेत शैक्षणिक साहित्य व दप्तर देण्यात आले.

आनंदो शाळा सक्षमीकरण प्रकल्पाच्या व्यवस्थापिका कांचन थोरवे, अलिबाग व उरण विभागाच्या समन्वयिका सारिका राऊत, उरण व पेण विभागाचे सहाय्यक समन्वयक, अमेया लॉजिस्टिक्स देणगीदार राकेश नायर, शाळा सल्लागार समिती अध्यक्ष पिरकोन, शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

बँकेत केवायसी करणे ठरतेय डोकेदुखी

तळा तालुका शेतकरी संघटनेतर्फे निवेदन

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरातील बँक ऑफ इंडिया शाखेत केवायसी करण्यासाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याने बँकेत केवायसी करणे म्हणजे नागरिकांसाठी एकप्रकारे डोकेदुखी ठरत आहे. याबाबत तळा तालुका शेतकरी संघटनेतर्फे शाखा व्यवस्थापकांना निवेदन देण्यात आले आहे.

तळा तालुका हा दुर्गम व डोंगराळ तसेच लहान-लहान खेड्यांनी वसलेला तालुका असून, केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना या थेट लाभार्थ्यांच्या खात्यात वितरीत होतात. बँक ऑफ इंडिया ही तालुक्यातील अग्रगण्य बँक असल्याने संपूर्ण तालुक्यातील जवळपास ८० टक्के खाती ही

बँक ऑफ इंडिया शाखेत आहेत. आरबीआयने घालून दिलेल्या निकष आणि नियमानुसार केवायसी करणे अनिवार्य करण्यात आल्याने बँक ऑफ इंडियाच्या तळा शाखेत नागरिकांची कायम वर्दळ असते. मात्र, ही केवायसी करीत असताना नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याने सर्व सामान्य शेतकरी, कष्टकरी लोकांना याचा खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच ज्यांच्याकडे हे काम असते ते नेहमी हिंदी भाषिक असतात व खातेदारांशी व्यवस्थित संभाषण होत नसल्याने याचा अडथळा अनेक खातेदारांना होतो.

त्यातच बँकेचे कर्मचारी ग्राहकांशी उद्धटपणे बोलत असल्याने सर्वसामान्य नागरिकांची मोठी कुचंबना होते. याबाबत तळा तालुका शेतकरी संघटनेतर्फे बँकेत निवेदन देण्यात आले असून, केवायसी बाबत सर्वसामान्य नागरिकांना सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच केवायसीबाबत परिस्थिती सुधारली नाही तर तालुक्यातील शेतकरी संघटनेतर्फे आंदोलन करण्यात येणार असल्याचे सदर निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत राऊत, उपाध्यक्ष रवि मांडवकर, सचिव कैलास पायगुडे यांसह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

गवतावर औषध फवारणी

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

शिवणसई-आंबे गावामध्ये शाळेभवती व मंदिर परिसरात उगवलेले गवत मारण्यासाठी सदस्य विश्वास पाटील यांनी स्वखर्चाने फवारणी करून घेतली. पावसाळ्यात अनेक ठिकाणी उपयोगी नसलेले गवत उगवते या गवतामुळे जाणाऱ्या नागरिकांना त्यातून वाट काढत जावे लागत होते. गवतात जलचर प्राणी (विंचू, साप) हे वास्तव्य करतात. त्यामुळे या उगवलेल्या गवतावर सदस्य विश्वास पाटील यांच्याकडून औषध फवारणी करण्यात आली. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून नागरिकांनी आभार मानले आहेत.

२८ वर्षीय तरुणाचा मृत्यू

नवीन पनवेल : कळंबोली सर्कल जवळ ट्रेलरने दुचाकीला दिलेल्या धडकेत २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी ट्रेलर चालका विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राजेश बेनबनसी हा सकाळी नऊ वाजता कामावर गेला. सायंकाळी साडेसातच्या सुमारास राजेश त्याच्या ताब्यातील होंडा स्प्लेंडर घेऊन जात असताना ट्रेलर चालकाने त्याच्या दुचाकीला धडक दिली. यात राजेश हा जखमी झाला. उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

विधानसभा मतदार संघावर काँग्रेसचा दावा

। उलवा । वार्ताहर ।

लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागताच इच्छुकांची भाऊगर्दी वाढू लागली आहे. नुकतीच काँग्रेस पक्षाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत महाविकास आघाडीतून उरण विधानसभेवर काँग्रेस पक्षाने दावा करून रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांना उमेदवारी देण्याचा ठराव घेऊन तो वरिष्ठांना पाठविला आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला यश मिळण्याच्या आशा वाढल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने आघाडीतील घटक पक्षांनी आतापासून उमेदवारी मिळविण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. नुकतीच काँग्रेस पक्षाची शेलघर उलवे नोड येथे उरण विधानसभा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत उरण विधानसभेवर दावा करून आघाडीचे उमेदवार म्हणून रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनाच उमेदवारी द्यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. सदरचा ठराव काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे पाठविण्यात आल्याचे समजते. या बैठकीस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, डॉ. मनिष पाटील, महेंद्र ठाकूर, जे. डी. जोशी, नाना म्हात्रे आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उरण विधानसभा जागेवर शिवसेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांची उमेदवारी जाहीर केली आहे. दुसरीकडे आघाडीच्या घटक पक्षाने या जागेवर दावा केला आहे.

पान १ वरून

शेकडो टन धान्य पाण्यात

मुसळधार पावसाने झोडपले. यामुळे तालुक्यातील अनेक परिसरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. एफसीआई परिसतील काही गोदमातदेखील पुराचे पाणी घुसले असून, गोदामातील धान्याची अनेक पोती पाण्यात भिजली आहेत.

२६ तासांनंतर कोकण रेल्वे सुरू

काही प्रवाशांनी मात्र खासगी गाड्या करून मुंबई गाठली. दुपारनंतर रेल्वेरुळावरील दरड हटवण्यात यश आले. संध्याकाळी ४.३० वाजण्याच्या रेल्वेरुळ वाहतुकीसाठी योग्य असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले.

गेले तीन दिवस रत्नागिरी जिल्ह्याला अतिवृष्टीने झोडपून काढले आहे. रविवारी सायंकाळी कोकण रेल्वेमार्गावर दिवाणखवटी येथे दरड कोसळली. दरड कोसळताच कोकण रेल्वे ठप्प झाली. तेजस एस्क्स्प्रेस आणि जनशताब्दी एक्स्प्रेस रत्नागिरी स्थानकात थांबवण्यात आल्या. कोकणकन्या एक्स्प्रेस वेरवली स्थानकामध्ये थांबवण्यात आली. सावंतवाडी-दिवा एक्स्प्रेस दिवाणखवटी येथे तर कोचीवली एक्स्प्रेस चिपळूण येथे थांबवण्यात आली होती. या गाड्यांतील सर्व प्रवासी रात्रभर गाडीतच अडकून पडले. रत्नागिरीत प्रशासनाकडून प्रवाशांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली. रेल्वेगाडी सुरु होईल या आशेवर प्रवाशांनी रात्र गाडीत काढली. दिवस उजाडला तरी कोकण रेल्वे ठप्पच होती. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे दिवाणखवटीतील दरड काढण्यात व्यत्यय येत होता. तसेच डोंगरातील माती सतत ट्रॅकवर येत होती. त्यामुळे रेल्वेमार्ग सुरळीत होण्यास विलंब लागला.

स्थलांतरीत कुटुंबं घरी परतली

मोहल्ला येथील ७ कुटूंबातील २० सदस्य तसेच सवाद येथील १० कुटूंबांतील ३१ सदस्य, साखर सुतारवाडी येथील ९ कुटूंबातील २५ सदस्य असे एकूण १७३ व्यक्ती सुरक्षितस्थळी स्थलांतरीत केल्यानंतर सोमवारी पावसाचा जोर ओसरताच पुन्हा आपआपल्या घरी परतल्याची माहिती देण्यात आली आहे. मात्र, दरड कोसळण्याची शक्यता आणि पूरस्थितीची शक्यता दिसून आल्यास या स्थलांतरीत लोकांना पुन्हा सुरक्षितस्थळी जाण्यास सांगण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

२०२१ च्या केवनाळे येथील भूस्खलनावेळी सुरक्षितस्थळी हलविण्यात आलेल्या एका कुटूंबातील पाच सदस्य आणि एक व्यक्ती पुन्हा घराकडे परतल्यानंतर जेवणाचा घास घेत असताना दरड कोसळून सहाही जणांना जीवंत समाधी मिळाली होती. अशा घटनांची पुनरावृत्ती घडू नये, यासाठी दरडप्रवण क्षेत्रातील ग्रामस्थांना पुन्हा दरडीच्या धोक्यातील घरांकडे जाण्यास मज्जाव करून प्रशासनाने त्यांची भोजनादी व्यवस्था करण्याची गरज व्यक्त होत आहे.

एसटीचा भीषण अपघात

लागत नव्हता. अचानक एक्सल तुटल्याने चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. परंतु, रस्त्याच्या कडेला असलेल्या आंब्याच्या झाडाला बस अडकल्याने मोठा अपघात टळला. एसटीतील प्रवाशांना स्थानिकांच्या मदतीने सुरक्षित काढण्यात आले. यामध्ये दोन प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

कशेडी घाटात दरडीचा धोका

करण्यात आली होती. मात्र, याठिकाणी ठेकेदार कंपनी 'एलएँण्डटी'कडून कायमस्वरूपी धोका निर्माण झाल्याने महामार्गालगतच्या धामणदिवीतील घरांचे भुसंपादन करून स्थलांतर करण्याऐवजी दीडदमडीची भरपाई देण्याचा मार्ग अवलंबिण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना आहे.

कशेडी घाटामध्ये धामणदेवी दत्तवाडी हद्दीत बोगद्याकडे जाणाऱ्या नवीन महामार्गाचे काँक्रिटीकरणाचे काम सुरू असून, याठिकाणीदेखील दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. याठिकाणी तळकोकणात आणि मुंबई दिशेने जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांवर दरड कोसळली तर एखादा मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे. डोंगराचा भाग खाली आला तर हा भुयारांना जोडणारा मार्ग बंद होण्याची शक्यता दिसून येत आहे. याच ठिकाणी चार दिवसांपूर्वी मातीचा ढिगारा खाली घसरत आला होता. भोगाव हद्दीत हायड्रोजन सिलिंडरची वाहतूक करणारा ट्रक दरीत कोसळून अपघात झाला तेव्हा तसेच दरडी कोसळण्यावेळी घाटरस्ता चर्चेत आणि घाटातील वाहनचालक प्रवासी जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करीत असल्याचे दिसून आले आहे. यामध्ये आणखी दरडीचा धोका निर्माण झाला असल्याने प्रवासीजनतेसह स्थानिकांनाही धोक्याची टांगती तलवार दिसून येत आहे.

चिरेखिंड-आंबेमाची रस्त्यावर दरड

पोलादपूर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक अनिल जाधव, पोलीस हवालदार स्वप्नील कदम यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचत पाहणी करून रस्ता सुरू करण्यासाठी तातडीने प्रयत्न केले. यावेळी तातडीने जेसीबी पाठवून रस्त्यावर आलेले झाडे तोडण्यात येऊन बाजूला सारण्यात आले. यावेळी दगड मातीचा ढिगारा बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी पूर्ववत करण्यात आल्याचे तालुका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

विश्वासघातकी लोक हिंदू कसे?

मी त्यांना सांगितलं, जोपर्यंत तुम्ही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर खुर्चीवर परत बसत नाहीत, तोपर्यंत लोकांच्या मनातील दुःख कमी होणार नाही. कोणाचं हिंदुत्व खरं हे समजून घ्यावे लागेल. पण, जो विश्वासघात करतो तो कधी हिंदुत्ववादी नसतो. जो विश्वासघात सहन करतो तो हिंदू असतो. जनतेचासुद्धा अपमान करण्यात आलेला आहे, जनमताचा अनादर करणे हे चुकीचे आहे.

... योजनेचा सावळागोंधळ

तहसील कार्यालयातही दाखले काढण्यासाठी महिलांची मोठी गर्दी झाली होती. आपली योजना फेल ठरण्याच्या भीतीने सरकारने त्यात बदल करीत उत्पन्नाचा दाखला, वय व अधिवास दाखल्याची अट रद्द केली आणि ६५ वर्ष वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ दिला जाणार असे सांगण्यात आले. या योजनेसाठी रेशनकार्ड, आधारकार्ड, शाळा सोडल्याचा अथवा जन्माचा दाखला, दोन छायाचित्र, बँक पास बुक आणि हमीपत्र आदी कागदपत्रांची पूर्तता करण्याची व्यवस्था केली. मात्र, या योजनेसाठी लागणाऱ्या हमीपत्रात आतापर्यंत तीन वेळा बदल करण्यात आला आहे. अगोदरच्या हमी पत्रात राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे छायाचित्र नव्हते. त्यामुळे त्यात बदल करून आताच्या हमीपत्रात मुख्यमंत्री व पंतप्रधान यांचे छायाचित्र देण्यात आले आहे. तसेच सेवा केंद्रातही ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दिला असताना, त्याठिकाणी सर्व्हर व कनेक्टीव्हीची समस्या निर्माण होत आहे. त्याचा परिणाम सेवा केंद्रात अर्ज भरण्याकडे पाठ फिरविली जात नसल्याचे दिसून येत आहे. अंगणवाडी सेविकांवर अर्ज भरण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, ग्रामीण भागात गेल्या अनेक दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे इंटरनेट कनेक्टीव्हीची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे त्यांनाही अर्ज भरताना अडचणी निर्माण होत असल्याचे बोलले जात आहे. जिल्ह्यात सध्या भातलावणीची कामे सुरु आहेत. महिलांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी अथवा प्रशासनामार्फत होत असलेल्या शिबिरासाठी जावे लागत आहे. त्यामुळे महिलांना भातलावणीच्या कामांसाठी वेळ देता येत नसल्याचे दिसून येत आहे. योजनेच्या सावळागोंधळाचा फटका महिलांना बसत आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविणेत येते की मौजे लोणघर, तालुका अलिबाग येथील गट नंबर ३६ गट नंबर ३७, गट नंबर ३८/२ गट नंबर ४१ आणि गट नंबर ८२ या मिळकती विद्यमान मालकांकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी, सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : १६/०७/२०२४

ॲड. संजय माधव आचार्य
मु. पोस्ट चौल.
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.

कडवनि

माझेरी रस्त्याची दुरवस्था

कोर्लई : गेल्या आठवड्यापासून जिल्ह्यात जोरदार पडलेल्या पावसामुळे मुरूड तालुक्यातील जीवनविस्कळीत झाले होते. यातच मुरुड-एकदरा-डोंगरी मार्गावर खोकरी आगरदांडाकडे जाणाऱ्या माझेरी मार्गावर खाच-खळगे व खड्डे पडून रस्त्याची पार दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावरून वाहने चालवताना वाहनचालकांची अक्षरशः डोकेदुखी ठरत आहे. तसेच, या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वेळप्रसंगी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मासिक संगीत सभा

पनवेल : श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३२ वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामधे संपन्न झालेल्या या कार्यक्रमात कॅलिफोर्निया (अमेरिका) येथील युवा गायक ऋग्वेद बर्वे यांनी आपली गायन सेवा सादर केली. ऋग्वेद यांनी आपल्या गायनाचा प्रारंभ भैरव या रागाने केला. त्यानंतर 'नमो नमो दुर्गे' ही देवीस्तुतीपर रागमाला सादर करून 'प्रसाद मजला द्यावा' या भैरवीने संगीत सभेची सांगता केली. देवेन मराठे यांनी संवादिनी साथ व अमेय तांबे यानी तबला साथ केली.

शिवबंधन बांधून प्रवेश

पनवेल : शिवसेना (उध्दव ठाकरे) पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन शेकडो महिलांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे. शिवसेना विभाग संघटिका नम्रता शिंदे व उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी यांच्या प्रयत्नाने तसेच शिवसेना उपनेत्या किशोरी पेडणेकर यांच्या हस्ते व शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या उपस्थीतीत नीता खिल्लारे, जयश्री साळवे यांच्या सहशेकडो महिलांनी शिवबंधन बांधून शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

मोरबे रस्त्याची दुर्दशा

पनवेल : प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतुन बांधण्यात आलेला मोरबे(कोंडले) ते करंबेळी हा रस्ता खड्ड्यात गेला आहे. ठिकठिकाणी खड्डे पडल्याने यातून वाहने चालवायची कशी, असा प्रश्न वाहन चालकांना पडत आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती कधी होणार व खड्डे मुक्त रस्ता कधी वापरायला मिळणार असा सवाल आदिवासी बांधव विचारत आहेत. या रस्त्याला ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. मोठमोठे खड्डे पडले असल्याने वाहन चालकांना त्याचा त्रास होत आहे.

कारागृहातील कैद्यांवर नजर

पनवेल : तळोजा मध्यवर्ती कारागृहातील २९६८ कैदी आणि बंदींच्या हालचालींवर यापुढे एआयच्या मदतीने ४५१ तिसऱ्या डोळ्यांची नजर असणार आहे. सोमवारी राज्याचे कारागृह व सुधारसेवा विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक व महानिरिक्षक अमिताभ गुप्ता यांच्या हस्ते कारागृहातील सीसीटिव्ही कॅमेरा नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला. यावेळी कारागृह उपमहानिरिक्षक योगेश देसाई, कारागृह अधीक्षक प्रमोद वाघ, उपअधीक्षक महादेव पवार, जितेंद्र काळे, तुरुंगाधिकारी राहुल झुटाळे कर्मचारी उपस्थित होते.

पावसाने चिरनेरचे निसर्ग बहरले

अक्कादेवी धरणात पर्यटकांची मांदियाळी

। उरण । वार्ताहर ।

वर्षा सहलीसाठी आवडते आणि निसर्गरम्य असलेले चिरनेर हे ठिकाण आता धुक्यात हरवून गेले आहे. पावसाने मुसळधार सुरुवात केल्याने चिरनेर निसर्गाच्या कुशीत डोंगरदऱ्यात असणारे अक्कादेवी धरण भरून वाहू लागल्याने रविवारी सुट्टीच्या दिवशी अनेक पर्यटकांनी आपल्या कुटुंबासह येथील फेसाळणाऱ्या पाण्याचा आनंद लुटण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी येथे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या पर्यटकांच्या वर्दळीमुळे छोट्या मोठ्या व्यवसायिकांनी समाधान व्यक्त केले.

उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गाव अर्थात २५ सप्टेंबर १९३० रोजीचा ब्रिटिश सत्तेविरोधात झालेला स्वातंत्र्यलढा हा याच अक्कादेवी धरणाच्या जंगल परिसरात झाला होता. याच ठिकाणी असणारे हे निसर्गरम्य अक्कादेवी धरण पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहे. वर्षासहलीसाठी दर रविवारी व सुट्टीच्या दिवशी पर्यटक मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असतात. अक्कादेवी धरणाजवळ आदिवासी वाडी आहे. शहरी पर्यटकांना डोंगर खोऱ्यातील आदिवासींचे जीवन कसे असते, याचे यथार्थ दर्शन त्यांना येथे घडत असते. निसर्गरम्य परिसर आणि धरणातून पडणारे पाणी याचा सुयोग्य मेळ या ठिकाणी गेल्यानंतर सहाजिकच अनुभवास येत असल्यामुळे हे धरण धोकाविरहित आहे.

चिरनेर गावाजवळ हे धरण असल्याने या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना गावातील व्यावसायिक खाद्य पदार्थ देखील उपलब्ध करून देत असतात. तसेच, या धरण क्षेत्राच्या अगदी मध्यभागी दगडी बांधिव विहीर असून या धरणाचा परिसर अत्यंत विलोभनीय व सुखावणारा आहे.

ऐतिहासिक व तीर्थक्षेत्राचा वारसा लाभलेल्या चिरनेर गावात आलेले अनेक पर्यटक आपल्या कुटुंबासह प्रथम श्री महागणपतीचे दर्शन घेतात. तसेच, स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन करत अक्कादेवी धरण परिसरातील निसर्गरम्य परिसराचा आनंद लुटत झुळझुळ वाहणाऱ्या अक्कादेवी धरणातील पाण्याचा मनसोक्तपणे आनंद घेतात. यावेळी हा परिसर पर्यटकांनी फुलून गेला होता. तरी चिरनेर ग्रामपंचायतीने या परिसराचा विकास करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नवी मुंबई येथील पर्यटक स्वाती पाटील यांनी व्यक्त केली आहे.

नांदगावमधील महिलांना मार्गदर्शन

। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्यातील महिलांचे संरक्षण व त्यांच्या प्रगतीसाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेची माहिती देणे, तसेच गावातील गोरगरीब महिलांना या योजनेचा जास्तीत जास्त फायदा मिळवून देण्यासाठी नांदगावच्या सरपंच सेजल घुमकर यांनी विशेष प्रयत्न सुरू केले आहे. त्याकरिता महिलांना मार्गदर्शन व अर्ज भरणे या कार्यक्रमाचे आयोजन नांदगावमध्ये करण्यात आले होते.

मुरूड तालुक्यातीली नांदगाव ग्रामपंचायत सभागृह, माळी समाज सभागृह, तसेच नागेश्वर नगर येथे महिलांच्या सभा घेऊन उपस्थित महिलांना मार्गदर्शनाबरोबरच काही महिलांचे प्रत्यक्ष अर्ज देखील भरण्यात आले. यावेळी नांदगावच्या उपसरपंच मेघा मापगावकर, मंजुम घोले, वृषाली रणदिवे, वैशाली वाघमारे, अंगणवाडी सेविका पल्लवी ठाकुर, मेघना ठोंबरे, रिद्धी मळेकर, रावजी पाटील, रचना कवळे व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

नर्सिंग प्रशिक्षण काळाची गरज

। रसायनी । वार्ताहर ।

कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालय भारत सरकारच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यामध्ये कार्यरत असणारी जन शिक्षण संस्थान रायगड व उज्वल भविष्य सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील 'नर्सिंग सहाय्यक' हे प्रशिक्षण घेणाऱ्या लाभार्थीसाठी एक दिवसीय 'नर्सिंग सेवा प्रशिक्षण जनजागृती कार्यशाळेचे' उद्घाटन संपन्न झाले. हा मार्गदर्शन कार्यक्रम राबवित असतांना या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी जन शिक्षण संस्थान रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, डॉ. विजय कोकणे, डॉ. राकेश सिंग, कुमार ठाकूर या मान्यवरांच्या उपस्थितीत व सचिन चव्हाण, रश्मी पाटील, राजश्री नाईक व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

निर्मला पाटील यांचा सत्कार

। अलिबाग । वार्ताहर ।

तालुक्यातीली मॉर्निंग वॉक ग्रुप आंबेपूर-पेझारीच्या सदस्य श्रीगाव येथील भाजीविक्रेत्या निर्मला नारायण पाटील यांच्या ७७ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून नुकताच कृतज्ञता म्हणून मॉर्निंग वॉक ग्रुपच्यावतीने त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. मॉर्निंग वॉक ग्रुपतर्फे अध्यक्ष प्रकाश नागू म्हात्रे यांच्या सकल्पनेतून ज्येष्ठांचा सन्मान केला जातो. त्यांच्याच हस्ते निर्मला नारायण पाटील यांचा पुष्पगुच्छ, मानपत्र, शाल, साडी देऊन ३१ वा सत्कार करण्यात आला. यावेळी मॉर्निंग वॉक ग्रुपचे सर्व सदस्य, निर्मला पाटील यांचे कुटुंबीय व मित्र परिवार उपस्थित होता.

म्हसळ्यांत ७० टक्के लावणी पूर्ण

। म्हसळा । वार्ताहर ।

राज्यात सर्वत्र पावसाचा जोर कायम आसतानाच पावसामुळे नदी, नाल्यांना पूर आला आहे. रायगड जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस सुरु आहे. जिल्ह्यांत सर्वात जास्त पावसाची नोंद म्हसळा तालुक्यात १४७८.८ मिमि तर सर्वात कमी खालापूर तालुक्यात ८६४.८ मिमि नोंद झाली आहे. भात लावणीसाठी पुरेसा पाऊस झाल्यामुळे म्हसळा तालुक्यात लावणीच्या कामांना वेग आला असून तालुक्यातील ६० ते ७० टक्के शेतकऱ्यांची भात लावणीची कामे पूर्ण झाली आहेत.

तालुक्यात एकूण १३५० हेक्टर भात शेती आहे, त्यापैकी अंदाजे ७५० हेक्टर लागवड झाली आहे. तालुक्यात नाचणीचे २६० हेक्टर क्षेत्र असून नाचणी लागवडीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. शेतात चिखल करत शेतकऱ्यांची भात लावणीची लगबग सुरू असून लावणी करताना ओले चिंब अंग आणि श्रम विसरण्यासाठी महिला कामगारांत वेगवेगळ्या गीतांचे स्वर ऐकू येत आहेत. मागील आठवड्यापासून अत्यंत समाधानकारक पाऊस पडत आसल्याने नाचणी, वरी लावणीला सुद्धा वेग आला आहे. काळसुरी, आडीठाकूर-पाष्टी तालुक्यात कृषी अधिकारी राजेंद्र ढंगारे, कृषी पर्यवेक्षक सुजय कुसळकर, रामेश्वर मगर, कृषी सहाय्यक धनंजय सरनाईक, गणेश देवडे, कल्पना शेळके यांनी आपापल्या कार्यक्षेत्रांत जाऊन शेतकऱ्यांना लावणी, पाणी निचरा पद्धत तसेच खत व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले.

आदर्श केंद्रशाळेच्या विद्यार्थिनींचे यश

। खांब । वार्ताहर ।

कोलाड येथील आदर्श केंद्रशाळेतील गार्गी बाबासाहेब ढाकणे व आकृती एकनाथ तेलंगे या विद्यार्थिनींनी विविध स्पर्धा परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवून शाळेचा गौरव वाढविला आहे.

गार्गी ढाकणे ही जवाहर नवोदय विद्यालय स्पर्धा परीक्षेत उत्तम गुणांनी गुणवत्ता यादीत येऊन नवोदय विद्यालयासाठी पात्र ठरली आहे. तेसच, पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत ग्रामीण विभागात पहिली तर जिल्ह्यात गुणवत्ता यादीत तृतीय आली असून रायगड गणित, विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित गणित संबोध परीक्षा सन २०२४ रोहा तालुक्यात प्रथम आली आहे. या शाळेची दुसरी गुणवंत विद्यार्थिनी आकृती एकनाथ तेलंगे

ही पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तम गुणांनी पास होऊन शिष्यवृत्ती धारक झाली आहे. तसेच, रायगड जिल्हा गणित विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित गणित संबोध परीक्षा २०२४ या परीक्षेत तालुक्यात दुसरी आली आहे.

या दोन्ही विद्यार्थिनींना सपना थळे, मुख्याध्यापिका श्वेता रिसबुड, संगिता म्हात्रे, सीमा कळमकर, पप्रवीण घाग, शुभांगी येरुणकर, रुची सामंत, मानसी जोशी, नंदकुमार तेलंगे आदी शिक्षकांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

सरकत्या जिन्याची प्रतिक्षा कायम

। नेरळ । प्रतिनिधी ।

मध्य रेल्वेवरील भिवपुरी रेल्वे स्थानकात सरकता जिना मंजूर होऊन बरेच दिवस झाले आहेत. परंतु, त्याचे काम अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे भिवपुरी रेल्वे स्थानकातील सरकता जिना प्रवाशांसाठी केव्हा उपलब्ध होईल, अशी विचारणा कर्जत येथील पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली होती. यावेळी रेल्वे प्रशासनाने हा सरकता जिना मार्च २०२५ पर्यंत उपलब्ध होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले आहे.

सध्या भिवपुरी रेल्वे स्थानकात दोन लिफ्टचे काम सुरू आहे व ते आता लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे. याबाबतीत आपण वेळोवेळी रेल्वे प्रशासनास पत्र व्यवहार करीत आहोत. परंतु, भिवपुरी रेल्वे स्थानकात सरकता जिन्याचे काम अद्याप सुरू झाले नसल्या कारणाने भिवपुरी प्रवासी रेल्वे प्रशासनावर नाराजी व्यक्त करीत आहेत. या बाबतीत भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष किशोर गायकवाड यांनी ओसवाल यांच्याशी संपर्क करून या बाबतीत आपण पाठपुरावा करावा, अशी विनंती केली होती.

आमशेत येथे वृक्षारोपण

। आंबेत । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यात सद्या अतिमुसळधार पाऊस पडत असून सर्वात जास्त पावसाची नोंद ही म्हाळर तालुक्यात झालेली आहे. यातच म्हसळा तालुक्यातील आमशेत गावी वृक्षारोपण सोहळा अतिशय उत्साहात आणि आनंदात गावकऱ्यांनी पार पाडला. यावेळी 'एक झाड माझ्या आईसाठी' या संकल्पनेनुसार ही वृक्षलागवड करण्यात आली. या लागवडीसाठी मुंबईकर मंडळींचा सुद्धा हातभार लागला होता. सर्व मुंबईकर त्याचप्रमाणे मुंबई कमिटी, ग्रामिण कमिटी व इतर सर्व सदस्यांनी यात सहभाग घेतला होता. आमशेत हे म्हसळा तालुक्यांतील अतिदुर्गम भागातील आणि दरड प्रवण क्षेत्रातील गाव आहे. येथील गावकऱ्यांनी जमिनीची होणारी धूप कमी करण्यासाठी हा अनोखा उपक्रम हाती घेत मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून समाजात एक वेगळा संदेश दिला आहे.

कृषी अधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील मुठवली खुर्द येथे संपन्न करण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात जिल्हा तसेच तालुका कृषी अधिकारी वर्गाने महत्वपुर्ण उपस्थिती नोंदवून या कार्यक्रमाची शोभा वाढविली. या वृक्षारोपण कार्यक्रमात गावातील मंदिर व शालेय परिसर तसेच गावाच्या अन्य मोकळ्या क्षेत्रात विविध जातींच्या वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, कृषी विकास अधिकारी मिलिंद चौधरी, जि.कृषी अधिकारी राजेश घरत यांच्यासह इतर अधिकारी पुनिता गुरव, पाटील, सतिश घोळवे, फडतरे, रणजित लवटे, अशोक दांडेकर, वेटकोळी यांच्यासह सरपंच मयुरी तुपकर, नलेश मालुसरे, योगेश शिंदे, कुमार कोल्हटकर, कविता शेळके, उस्मिता मानकर, घन:श्याम कराळे, संदेश तुपकर, हेमंत मालुसरे, गोपाळ खरिवले, मारूती तुपकर, महेश तुपकर, केशव खरिवले व ग्रामस्थ उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Tally अकाऊंट कामाचा अनुभव असलेली लेडीज हवी आहे. ८००७८३३२३२ झिराड, पगार १८०००/२१०००
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९७६२७७७९७५
- शॉप भाडेने देणे आहे. आत २००sq.ft. आणि बाहेर २०० sq.ft.R.C.F. कॉलनी समोर, साळवी ऑटोचे शेजारी, भाडे -१०,०००/- ८२०८३७२०३०, ७७५८००३४५६
- रसिक हार्डवेअर अलिबाग ९४२२६९०८५४, दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे.
- Design Metrics is Hiring!
  Need a gradute Architect or Intern at our Studio in Alibag. Skills required - Autocad, sketchup, Photoshop & ms office. Kindly Share your CV and Portfolio on designmetricsoffice@gmail.com
  Contact No - 9970051876

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

रांजणखार नवरात्रौत्सव मंडळाची कार्ले गडावर स्वच्छता

एकविरा आई मंदिर परिसराची साफसफाई

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील रांजणखार येथील नवरात्रौत्सव मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत आतापर्यंत विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, स्वच्छता मोहीम, पूरग्रस्तांना मदतीचा हात आदींचा समावेश आहे. दरम्यान, नुकतेच कार्ला येथील एकविरा आईच्या गडावर स्वच्छता मोहीम राबवून गड परिसर आणि पायऱ्यांची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत मंडळाचे जवळपास वीसहून अधिक सदस्य सहभागी झाले होते.

रांजणखार नाका नवरात्रौत्सव मंडळ यांच्यावतीने आतापर्यंत विविध सामाजिक उपक्रम राबवून नावलौकिक मिळवला आहे. मंडळातील सभासदांनी एकत्र येत आतापर्यंत अनेक उपक्रम यशस्वीरित्या पार पाडले आहेत. त्यामध्ये दरवर्षी वृक्षारोपण मोहीम हाती घेऊन समाजामध्ये वृक्षसंवर्धनाविषयी जनजागृती करण्यात येते. तसेच, रक्तदान हेच श्रेष्ठदान यानुसार रक्तदान शिबिरांचे आयोजन करुन आतापर्यंत शेकोडो बाटल्या रक्ताचे संकलन करण्यात आले असून, मंडळातर्फे समाजामध्ये रक्तदानाविषयी प्रबोधन करण्यात आले आहे. तसेच, जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवून याठिकाणचा परिसर स्वच्छ करण्यात पुढाकार घेतला

आहे. त्याचप्रमाणे महाड येथील पूरग्रस्तांना मदतीचा हात देत त्यांच्या घरांतील चिखल, माती काढून स्वच्छतेबरोबरच पूरग्रस्तांना अन्नधान्य वाटप केले आहे. मंडळाच्या या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांचे सर्व स्तरातून विशेष कौतुक करण्यात आले आहे.

दरम्यान, रांजणखार नवरात्रोस्तव मंडळाच्यावतीन कार्ला येथील एकविरा गड परिसर आणि पायऱ्यांवरील कचरा गोळा करुन साफसफाई करण्यात आली. तसेच, गोळा करण्यात आलेल्या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली. या श्रमदान मोहिमेत राजेंद्र पाटील, दिलीप पाटील, गंगाधर (हाशिवरे), समीर पाटील, जितेंद्र पाटील, मनोज पाटील, परेश पाटील, अखिलेश, सदन, अतिश, संदीप, नंदकुमार आदी सदस्यांनी सहभाग घेत परिसर स्वच्छ केला. या श्रमदान मोहिमेचे नियोजन रांजणखार येथील पाटील ट्रेडर्स यांच्याकडून करण्यात आले होते. श्रमदानाच्या वेळी अनेक भाविकांनी उत्स्फूर्तपणे शुभेच्छा देत कामाचे कौतुक केले.

सिडकोची योजना सर्वसामान्यांच्या फायद्याची

४८ भूखंड, २१८ दुकानांची होणार विक्रीची योजना

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये निवासी, बंगला, निवासी तथा वाणिज्यिक, वाणिज्यिक, सेवा उद्योग आणि स्टार हॉटेल वापराकरिता ४८ भूखंडांसह सिडकोच्या गृहनिर्माण संकुलातील २१८ दुकानांच्या विक्रीची भव्य योजना सादर करण्यात आली आहे. भूखंड विक्री योजनेच्या ऑनलाइन नोंदणीस ६ जुलैपासून सुरुवात झाली आहे. तर, दुकान विक्री योजनेच्या ऑनलाइन नोंदणीस १६ जुलैपासून सुरुवात होणार आहे.

सिडकोतर्फे ४८ भूखंडांसह २१८ दुकानांच्या विक्रीची भव्य योजना जाहीर करण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्याबरोबरच सिडकोतर्फे नेहमीच शहरातील बांधकाम क्षेत्राला आणि वाणिज्यिक उपक्रमांना चालना देण्यासाठी भूखंड, दुकाने आणि वाणिज्यिक जागांच्या विक्रीच्या योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांमुळे नवी मुंबईची अर्थव्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होत आहे. या वेळच्या योजनेमध्ये सर्वसामान्य नागरिकांना नवी मुंबईसारख्या शहरात स्वत:चे मनपसंत घर (बंगला) बांधण्याची सुवर्णसंधी लाभली आहे. तसेच दुकान विक्रीच्या योजनेतून बांधकाम व्यावसायिक, उद्योजक, लघु व मध्यम व्यावसायिक या घटकांनाही आपल्या व्यवसाय वाढीची उत्तम संधी लाभली आहे, अशी माहिती सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.

सिडकोतर्फे सातत्याने राबवण्यात आलेल्या निवासी व वाणिज्यिक भूखंड, दुकाने, वाणिज्यिक जागा यांच्या विक्री योजनांना नागरिक, व्यावसायिक, विकासक इ. घटकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

या वेळी सिडकोतर्फे नवी मुंबईच्या घणसोली, नेरूळ, सीबीडी बेलापूर, खारघर, कोपरखैरणे, कळंबोली, पनवेल (पू.) आणि पनवेल (प.) नोडमधील निवासी, बंगला, निवासी तथा वाणिज्यिक, वाणिज्यिक, सेवा उद्योग आणि स्टार हॉटेल वापराकरिताचे ४८ भूखंड ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेकरिता https://eauction.cidcoindia.com/ हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. योजनेकरिता ऑनलाइन नोंदणीचा कालावधी ८ ते २३ जुलै आहे. योजनेचा निकाल २५ जुलै रोजी जाहीर करण्यात येईल.

तसेच सिडकोच्या स्वप्नपूर्ती गृहसंकुलासह नवी मुंबईतील तळोजा, कळंबोली, घणसोली, खारघर आणि द्रोणागिरी नोडमधील गृहसंकुलांतील २१८ दुकाने ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेकरिता https://eauction.cidcoindia.com/ हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. योजनेच्या ऑनलाइन नोंदणीस १६ जुलै २०२४ पासून सुरुवात होणार आहे. योजनेचा निकाल २० ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

या योजनांतील भूखंड आणि दुकाने असणारी गृहसंकले नवी मुंबईतील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी व वेगाने विकसित होणाऱ्या नोडमध्ये आहेत. योजनेतील भूखंड हे सर्व पायाभूत सुविधांनी सुसज्ज आहेत. तसेच गृहसंकुलांचा परिसर हा सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण आहे. महामार्ग, मेट्रो, रेल्वे यांद्वारे या भूखंडांना आणि गृहसंकुलांना उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. तसेच सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी या महत्त्वाच्या ठिकाणांपासूनही हा परिसर नजीकच्या अंतरावर आहे.

भूखंड विक्रीच्या योजनेद्वारे बांधकाम विकासकांसह सर्वसामान्य नागरिकांनाही आपल्या स्वप्नातील घर नवी मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरामध्ये साकारण्याची संधी मिळणार आहे. या योजनेंतर्गत लहान, मध्यम व मोठ्या क्षेत्रफळांचे भूखंड उपलब्ध आहेत. तसेच वाणिज्यिक, सेवा उद्योग आणि स्टार हॉटेल भूखंडांमुळे शहरातील वाणिज्यिक उपक्रमांना चालना मिळणार आहे. स्वप्नपूर्तीसह सिडकोच्या विविध गृहसंकुलांतील दुकानांद्वारे लघु व मध्यम व्यावसायिकांना नवी मुंबईमध्ये व्यवसाय वृद्धीची संधी उपलब्ध होणार आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे जामरूंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रकाश बबन चव्हाण २) शिवाजी जगन्नाथ बिबवे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे जामरूंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू. पै.)
१३८	१	०-४२-००	०-१७

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १६/०७/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

CIDCO
WE MAKE CITIES

CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

NOTIFICATION

UNDER SECTION 68(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966

Town Planning Scheme No. 8 (TPS-8)

No. CIDCO/NAINA/TPS-08/2024/104, Dt. 8th July 2024

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12, dated 10th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27th April, 2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, under Section 31(1) of the said Act and vide Notification No. TPS. 1215/245/C.R. 332/16/EP/UD-12, dated 1st March, 2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1717/MIS-2750/C.R.91/2019/UD-12, dated 16th September, 2019 has sanctioned the Development Plan (DP) for 151 villages of NAINA u/s 31(1) of the MR & TP Act, 1966.

And whereas, as per Section 60(1) of the said Act, CIDCO's Board vide Resolution No. 12631, dated 9th December 2022, had declared its intention for making of Town Planning Scheme No. 8 (TPS-8) at part of all villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje of Taluka Panvel, District Raigad under Sub-section (1) of Section 60 of the said Act and a notice about declaration of making TPS-8 as per provision in Section 60(2) of the Act, has been published in Maharashtra Government Gazette Extra-ordinary (Part-II) dated 22nd December 2022 and in daily newspapers "Raigad Nagri" and "Newsband" dated 27th December 2022.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. टीपीएस-1219/1524/प्र.क्र.64/19/नवि 12 दिनांक 31 जुलै 2019 had sanctioned the suspension of certain regulations of Development Control and Promotion Regulations of Interim Development Plan of NAINA corresponding to proposed special DCR of TPS-8 in accordance with section 59(1)(b)(iii) of the Act for the proper carrying out of the scheme.

And whereas, TPS -8 land owners meet was conducted in-person on 14th and 15th February 2023 as per rule No. 4(1) of MTPS Rules 1974 by inviting all the land owners to view their land details and the draft layout plan of the scheme at CIDCO- NAINA office, CBD Belapur, Navi Mumbai. After incorporating suggestions received from the owners, consultation as per Section 61(1) and MTPS Rule 1974, 4(2), and approval for suitable amendments in Development Plans under section 59(2) was sought from the Director of Town Planning, GoM vide submission dated 19th May 2023.

And whereas, under Section 61(1) of the said Act, the Planning Authority shall, in consultation with the Director of Town Planning, make a draft scheme for the area in respect of which the declaration was made, and publish a notice in the Official Gazette within nine months or within the extended period from the date of the declaration.

And whereas, the Joint Director of Town Planning, Konkan division vide Order No TPS No. 8/NAINA/Section 61(3)/Time-Limit Extension/JDTP-KDN/2298 dated 6th September, 2023 has granted extension of three months' time i.e. up to and inclusive of 21st December 2023 for making and publication of the said draft scheme.

And whereas, the Director of Town Planning vide letter जा.क्र.वि.यो.नैना/नरयो क्र.०८/कलम ६१(१)/टिपीव्ही-३/६५३० dated 5th December 2023 had offered consultation as per Section 61 (1) and approval for suitable amendments in Development Plans under section 59(2) on TPS-8 of the said act.

And whereas, under Section 61 (1) of the said Act, necessary changes have been incorporated as per consultation, a notice of making draft TPS-8 has been published in official Maharashtra Government Gazette (part-II) dated 12th December 2023 and in local newspapers 'Kille Raigad' and 'Navrashtra' on 22nd December 2023 for inviting suggestions/objections within one month of notice in accordance with the provisions of section 67 of the said Act.

And whereas, the Government of Maharashtra in exercise of powers conferred by sub-section (1) of section 151 of the Said Act, vide Notification No TPS-1817/973/CR-103/17/UD-13 dated 13th September 2017 had delegated the powers exercisable by it under section 68(2) of the said Act to Managing Director, CIDCO (hereinafter will be referred to as "VC&MD")

And whereas, after incorporating necessary changes as per suggestions received, the draft scheme has been submitted to VC&MD for sanction in accordance with section 68(1) of the Said Act on 21st February 2024.

And whereas, in accordance with sub-section (2) of section 68 of the Said Act, VC&MD had sought consultation of Director of Town Planning, Maharashtra State on 23rd February 2024 prior to sanction of Draft Scheme.

And whereas, the Director of Town Planning vide letter जा. क्र. प्रा.न.र.यो क्र.०८/नैना/कलम 68(1)/प्र.क्र.96/24/टिपीव्ही-3/2578 dated 20th May 2024 has given consultation under section 68(2) of the said act for sanction of Draft TPS-8.

And whereas, Model Code of Conduct by the Election Commission of India in respect of general election to Lok Sabha was made applicable with effect from 16th March 2024 and further extended by the notification of 6th June, 2024 for State Legislative Council Election of Post-Graduate Constituency Konkan Division till the completion of the election i.e 5th July 2024 as per Election Commission of India, Press Note dated 24th May, 2024, the said time period is excluded under section 148-A of the said act.

Now, therefore, in accordance with the powers delegated to me by the State Government vide Notification dated 13th September 2017, the Draft Town Planning Scheme No.8 (TPS-8) at part area of all villages as shown on declaration plan, namely; Moho, Pali Khurd, Belavali, Chikhale, Ambivali, Lonivali, and Wangani Tarf Waje of Taluka Panvel, District Raigad is hereby sanctioned under section 68(2) of the MR&TP Act, 1966 along with corresponding Special Development Control Regulations.

A copy of the draft TPS-8 scheme book, plans thereof along with corresponding Special DCRs are made available for inspection by the public during office hours on all working days in the office NAINA, 8th floor, Tower No.10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400614 in accordance with sub-section (3) of section 68 of the Said Act. The same is also uploaded on website of CIDCO i.e. https://cidco.maharashtra.gov.in//naina and further can be obtained after payment of prescribed fees.

Place : Navi Mumbai
Date :
Regd. Office : Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai-400021.

Vijay Singhal
Vice Chairman & Managing Director,
CIDCO

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ च्या
कलम ६८ च्या उपकलम (२) नुसार
नगररचना परीयोजना क्रमांक ८ (टीपीएस -८)
क्र. सिडको / नैना/ टीपीएस-०८/२०२४/१०४, दि. ८ जुलै २०२४

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२ दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१२१५/२४५/सीआर -३३२/२०१५/एस.एम./यूडी -१२, दिनांक २७ एप्रिल, २०१७ नुसार अधिनियमाच्या कलम ३१(१) नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२ दिनांक ०१ मार्च, २०१९ अन्वये अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहेत.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१७१७/ एमआयएस २७५०/सीआर - ९१/२०१९/यूडी -१२, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ नुसार नैनातील १५१ गावांसाठी विकास आराखडा मंजूर केला आहे.

आणि ज्याअर्थी, अधिनियमातील कलम ६०(१) नुसार सिडकोच्या संचालक मंडळाने दिनांक ०९ डिसेंबर २०२२ रोजीच्या ठराव क्र. १२६३१ अन्वये नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे पालिखुर्द, मोहो, चिखले, बेलवली, वांगणी तर्फे वाजे, आंबिवली व लोणिवली येथील काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक ०८ (टीपीएस - ०८) करण्याचा इरादा घोषित केला आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६०(२) मध्ये नमूद तरतूदीनुसार टीपीएस -८ करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग दोन मध्ये आणि दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रे 'रायगड नगरी' आणि 'न्यूजबॅन्ड' यात प्रकाशित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परीयोजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उक्त अधिनियमाच्या कलम ५९(१)(ख)(iii) अन्वये महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१२१९/१५२४/प्र.क्र.६४/१९/नवि १२ दिनांक ३१ जुलै, २०१९ अन्वये मंजूर अंतरिम विकास योजनेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या काही तरतुदींच्या तहकुबीला मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर परियोजनेच्या वेळापत्रकास अनुसरून टीपीएस नियम १९७४ च्या नियम क्र. ४(१) नुसार नगर रचना परियोजना - ८ मधील संबंधित जमीन मालकांची सभा दिनांक १४ व १५ फेब्रुवारी, २०२३ रोजी आयोजित करण्यात आली. जमीन मालकांकडून मिळालेल्या सूचनांचा समावेश केल्यानंतर, कलम ६१(१) नुसार आणि टीपीएस नियम १९७४ च्या नियम क्रमांक ४(२) नुसार, कलम ६१ (१) प्रसिद्धीपूर्व सल्लामसलतीसाठी आणि कलम ५९(२) अन्वये विकास आराखड्यातील आरक्षणाच्या बदलांना मान्यते करिता, दिनांक १९ मे, २०२३ रोजीच्या प्रस्त्वान्वये टीपीएस-८ चा मसुदा संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविण्यात आला.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६१ नुसार (१) नियोजन प्राधिकरणाने संचालक, नगर रचना, यांच्याशी सल्लामसलत करून, ज्या योजनेसाठी घोषणा करण्यात आली त्या क्षेत्रासाठी प्रारूप योजना तयार करुन घोषणेच्या तारखेपासून नऊ महिन्यांच्या आत किंवा वाढीव कालावधीत अधिकृत **महाराष्ट्र शासन राजपत्रात** नोटीस प्रकाशित करावयाची आहे.

आणि ज्याअर्थी, सह संचालक, नगर रचना, कोकण विभाग यांनी आदेश क्रमांक प्रा) कलम ६१/नैना/क्र.८ यो.र.न.३/सहसंकोवि/मुदतवाढ/२२९८ दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ अन्वये प्रारूप योजना बनवून प्रकाशित करण्यासाठी तीन महिन्यांचा म्हणजेच दिनांक २१ डिसेंबर, २०२३ हा दिवस धरून त्यापर्यंतचा वाढीव कालावधी दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या जा.क्र.वि.यो.नैना/नरयो क्र.०८/कलम ६१(१)/टिपीव्ही-३/६५३० पत्रान्वये टीपीएस -८ बाबत उक्त अधिनियमाच्या कलम ५९(२) अन्वये मान्यता व कलम ६१ (१) अन्वये प्रसिद्धीपूर्व सल्लामसलत दिली आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना यांनी सल्लामसलतीत सुचविल्याप्रमाणे आवश्यक ते बदल टीपीएस -८ मध्ये करून उक्त अधिनियमातील कलम ६१(१) च्या तरतुदींनुसार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजीच्या **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग दोन मध्ये आणि दिनांक २२ डिसेंबर, २०२३ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रे 'किल्ले रायगड' आणि 'नवराष्ट्र' यात प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक - ८ तयार करण्यात आली आहे असे जाहीर केले आहे आणि ती प्रसिध्द करण्यात आली आहे व अधिनियमाच्या कलम ६७ नुसार लेखी आक्षेप मागविण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम १५१ च्या उप-कलम (१) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या अधिसूचना क्रमांक टीपीएस -१८१७ /९७३/ सीआर-१०३/१७/ यूडी-१३ अन्वये त्यांच्यातर्फे कलम ६८(२) अंतर्गत वापरण्यात येणारे अधिकार सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, यांना प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, प्राप्त झालेल्या लेखी आक्षेप विचारात घेऊन त्याप्रमाणे आवश्यक बदल समाविष्ट केल्यानंतर, प्रारूप योजना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना उक्त अधिनियमाच्या कलम ६८(१) नुसार दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी मंजुरीसाठी सादर करण्यात आली.

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उप-कलम (२) नुसार, प्रारूप योजना मंजूर करण्यापूर्वी संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य यांची सल्लामसलत मागितली आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २० मे, २०२४ रोजीच्या जा.क्र. प्रा.न.र.यो क्र.०८/नैना/कलम ६८(१)/प्र.क्र.९६/२४/टिपीव्ही-३/२५७८ पत्रान्वये उक्त अधिनियमाच्या कलम ६८च्या उप-कलम २ अन्वये प्रारूप नगर रचना परियोजना -८ मंजुरी बाबत सल्लामसलत दिली आहे.

आणि ज्याअर्थी, भारताच्या निवडणूक आयोगाकडून लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता लागू असलेला आदर्श आचारसंहिता कालावधी दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी लागू करण्यात आला व तो ६ जून, २०२४ च्या अध्यादेशानुसार विधान परिषद कोंकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीकरिता दिनांक २४ मे, २०२४ च्या प्रेस नोट द्वारे नमूद निवडणूक संपेपर्यंत म्हणजेच दिनांक ५ जुलै, २०२४ पर्यंत वाढविण्यात आला, सदर कालावधी उक्त अधिनियमाच्या कलम १४८-अ अन्वये वगळण्यात आला आहे.

म्हणून, आता या अधिसूचनेद्वारे, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ च्या अधिसूचनेअन्वये राज्य शासनाद्वारे मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नकाशात दर्शविल्याप्रमाणे सीमेत समाविष्ट क्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे पालिखुर्द, मोहो, चिखले, बेलवली, वांगणी तर्फे वाजे, आंबिवली व लोणिवली येथील काही भागात **प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक ८** (टीपीएस -८) त्यासोबतच्या नकाशा, अहवाल व विशेष विकास नियंत्रण नियमावलीसह उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उप-कलम (२) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उप-कलम (३) नुसार मंजूर प्रारूप टीपीएस -८ योजनेची प्रत संबंधित विशेष नियंत्रण नियमावलीसह नैना कार्यालय, ८ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे कार्यालयीन कामकाजाच्या सर्व दिवशी नागरीकांच्या अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे. तसेच प्रारूप टीपीएस-८ची प्रत सिडकोचे संकेतस्थळ https://cidco.maharashtra.gov.in//naina येथेसुद्धा अपलोड केली आहे आणि ती विहित शुल्क भरल्यानंतर देखील मिळू शकते.

स्थळ : नवी मुंबई
दिनांक : ८ जुलै २०२४
नोंदणीकृत कार्यालय: निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०००२१

विजय सिंघल
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
CIDCO/PR/096/2024-25

क्षणिक

लिओन मेस्सी रडला

न्यूयॉर्क : कोपा अमेरिका कपच्या अंतिम फेरीत अर्जेंटिनाने कोलंबियाविरुद्ध चुरशीच्या सामन्यात विजय मिळवला. सामन्याच्या पूर्ण वेळेपर्यंत दोन्ही संघांना गोल करता आला नाही. त्यामुळे सामना अतिरिक्त वेळेत खेळला गेला. जेथे अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लॉटारो मार्टिनेझने गोल केला. अर्जेंटिनाने १६ व्यांदा ही स्पर्धा जिंकली आहे. सामन्या दरम्यान लिओन मेस्सी ढसाढसा रडला. सर्व खेळाडूंनी मैदानावर विजयोत्सव साजरा केला. प्रेक्षकांनी देखील त्यांना शुभेच्छा दिल्या.

रिकीने घेतली फारकत

नवी दिल्ली : रिकी पाँटिंग पुढील हंगामात दिल्ली कॅपिटल्सचा प्रशिक्षक असणार नाही. त्याने दिल्ली कॅपिटल्सपासून फारकत घेतली आहे. फ्रेंचाइजीने सोशल मीडियावर ही माहिती दिली आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंग गेली ७ वर्षे दिल्ली कॅपिटल्सचा मुख्य प्रशिक्षक होता. त्याच्या कार्यकाळात दिल्ली कॅपिटल्स कधीही चॅम्पियन बनला नाही. सध्याचे संघ संचालक सौरव गांगुली यांच्याकडे पुढील हंगामात मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी दिली जाण्याची शक्यता आहे.

आभा खटुआचे नाव वगळले

नवी दिल्ली : भारताची गोळाफेकपटू आभा खटुआ हिचे नाव पॅरिस ऑलिम्पिकसाठीच्या भारतीय ॲथलेटिक्स संघाच्या यादीतून वगळण्यात आले आहे. जागतिक ॲथलेटिक्सकडून रविवारी ही यादी जाहीर करण्यात आली. भारतीय ॲथलेटिक्स संघटनेकडून भारताच्या ३० खेळाडूंच्या नावांची यादी पॅरिस ऑलिंपिकसाठी पाठवण्यात आली होती. यादीत ३० पैकी २९ खेळाडूंच्याच नावांचा समावेश होता. आभा ही जागतिक क्रमवारीच्या आधारावर पॅरिस ऑलिंपिकपर्यंत पोहोचली होती.

झिम्बाब्वेचा पराभव

हरारे : टीम इंडियाने रविवारी हरारे मैदानावर खेळल्या गेलेल्या ५ व्या टी-२० मध्ये झिम्बाब्वेचा पराभव केला. तसेच ५ सामन्यांची टी-२० मालिका ४-१ ने जिंकली. ५ व्या टी-२० मध्ये झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजी दिली. संजू सॅमसनने अर्धशतक केले आणि रियान परागसोबत ६५ धावांची भागीदारी केली. शिवम दुबेने डेथ ओव्हर्समध्ये चौकार आणि षटकार मारत संघाची धावसंख्या १६७ धावांपर्यंत नेली. झिम्बाब्वेचा संघ १८.३ षटकात सर्वबाद १२५ धावांवर आटोपला.

रोहित अजून खेळणार

मुंबई : टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर टी-२० मधून निवृत्तीची घोषणा करणाऱ्या रोहित शर्माने कसोटी आणि वनडेमध्ये खेळण्याची आपली योजना उघड केली आहे. सचिव जय शाह यांनी विश्वचषक जिंकल्यानंतर संघाचे अभिनंदन केले आणि एक व्हिडिओ संदेश जारी केला आहे. त्यांनी सांगितले की, रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफी आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल जिंकेल. यावरुन रोहित खेळणार असल्याचे स्पष्ट होते.

इंग्लंड पराभूत, युरोकप स्पेनकडे

। बर्लिन । वृत्तसंस्था ।

युरो कप २०२४ च्या अंतिम फेरीत स्पेन विरुद्ध इंग्लंड यांच्यात सामना खेळवला गेला. या सामन्यात स्पेनने उत्कृष्ट कामगिरी करत सामना २-१ ने जिंकला. या विजयासह विक्रमी ४ वेळा युरो कपचे जेतेपद पटकावणारा स्पेन पहिला संघ ठरला आहे. या संघातील तरूण खेळाडू असलेला लामिने यामल यानेही एक विक्रम आपल्या नाव केला आहे. फुटबॉलमधील सर्वकालीन महान खेळाडू पेले यांचा विक्रम लामिने यामलने मोडण्याची करामत केली आहे.

लामिनेने उपांत्य फेरीत झालेल्या सामन्यात महत्त्वपूर्ण गोल करत संघाला अंतिम फेरीत स्थान मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली. यासह अंतिम सामन्यात खेळत लामिनेने एक विक्रम आपल्या नावे केला आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत सहभागी होणारा स्पेनचा लामिने यामल हा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. लामिनेचे वय १७ वर्षे आणि १ दिवस आहे.

यामलने पेले यांना मागे टाकत सर्वात कमी वय असणारा खेळाच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू ठरला. १९५८ च्या फिफा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत सहभागी झालेल्या पेले यांचे वय १७ वर्षे २४९ दिवस होते. तर लामिने हा पेले यांच्यापेक्षा २४८ दिवसांनी लहान आहे. अशारितीने लामिनेने पेले यांना मागे टाकत हा विक्रम आपल्या नावे केला आहे. लामिने यामलने या स्पर्धेत मोडलेला हा पहिला विक्रम नाही. फ्रान्सविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात यामलने अनेक विक्रम रचले. युरो २०२४ मध्ये लामिने यामल हा १६ वर्षे आणि ३६२ दिवस वयाचा असताना स्पर्धेत गोल करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. त्याने स्वित्झर्लंडच्या जोहान वोनलाथेनचा २००४ च्या सीझनमधील १८ वर्षे आणि १४१ दिवस वयाचा असताना गोल करण्याचा विक्रम मागे टाकला. लामिने यामलच्या विक्रमी गोलने फ्रान्सविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या पहिल्या हाफमध्ये २१ व्या मिनिटाला अप्रतिम कर्लिंग शॉट मारून स्कोअर १-१ असा बरोबरीत आणला. यामलने युरो २०२४ मध्ये आपल्या अतुलनीय कामगिरीने फुटबॉल जगताला भुरळ घातली आहे. त्याची लिओनेल मेस्सीशी तुलना केली जात आहे. काही दिवसांपूर्वी लामिने यामल आणि लिओनेल मेस्सी यांचा २००७ मधील फोटोशूटचा एक फोटोही व्हायरल झाला होता. युरो २०२४ मधील यमालच्या अविश्वसनीय मोहिमेने जागतिक फुटबॉलला अजून एक चॅम्पियन खेळाडू मिळाला असल्याचे म्हटले जात आहे.

विक्रम मोडण्याची आणि इतिहास घडवण्याच्या त्याच्या क्षमतेमुळे मेस्सी आणि क्रिस्टियानो रोनाल्डो यासारख्या दिग्गज खेळाडूंशीही त्याची तुलना केली जात आहे.

फुटबॉल क्रीडा जगतामध्ये त्याच्या रुपाने एक प्रतिभावंत खेळाडू मिळाला आहे. त्याने केलेल्या कामगिरीने त्याचे चाहते मात्र चांगलेच भारावुन गेले आहेत. त्याच्याकडून अशाच चांगल्या खेळाची अपेक्षा व्यक्त केली जाते.

कबड्डी स्पर्धा, महिलांचा संघ

। गडब । वार्ताहर ।

१८ ते २० जुलै दरम्यान पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या ७१ व्या महाराष्ट्र राज्य अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनने महिला गटाचा संघ जाहीर केला आहे.

या संघाचे सराव शिबिर पांडवादेवी येथील जय मंगळ सभागुहात घेण्यात आले. या सराव शिबिराचे सांगता समारंभ प्रसंगी आंतर राष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पंच प्रमुख शरद कदम, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सदस्य जनार्दन पाटील, राष्ट्रीय खेळांडु ऋणाली मोकल आदि मान्यवर आणि खेळाडू उपस्थित होते.

असोसिएशनचा या वर्षाचा महिलांचा संघ चांगला आहे. या संघामधे चार राष्ट्रीय खेळांडु आहेत. जिल्ह्याचा संघ अंजिक्यपद मिळविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे संघ प्रशिक्षक शरद कदम यांनी सांगितले.

रायगड जिल्हा महिला कबड्डी संघ

सिध्दी नाखवा-कर्णधार, चैताली म्हात्रे-उपकर्णधार, रश्मी पाटील, हर्षदा पाठारे, तेजा सकपाळ, नंदिनी वाघे, रुतुजा पाटील, पल्लवी बागेकर, वैष्णवी पाटील, रचना म्हात्रे, प्रिती पाटील, जानवी पाटील, शरद कदम-संघ प्रशिक्षक, मोनाली घोंगे-संघ व्यवस्थापिका यांचा समावेश आहे.

१६ वेळा जिंकले जेतेपद
अर्जेंटिनाचा कोलंबियावर विजय

। अमेरिका । वृत्तसंस्था ।

लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिनाने सलग दुसऱ्यांदा कोपा अमेरिकाचे विजेतेपद पटकावले आहे. कोलंबियाविरुद्धचा विजेतेपदाचा सामना निर्धारित वेळेत ०-० असा बरोबरीत होता. पहिल्या अतिरिक्त हाफमध्येही दोन्ही संघांना गोल करता आला नाही.

पण ११२ व्या मिनिटाला लुतारो मार्टिनेझने अर्जेंटिनासाठी गोल केला. या गोलनंतर ही आघाडी अर्जेंटिनाने शेवटपर्यंत कायम राखली आणि मेस्सीचा संघ १-० असा विजय मिळवत चॅम्पियन ठरला. अर्जेंटिनाने १६ व्यांदा ही स्पर्धा जिंकली आहे. २०२१ मध्ये संघाने विजेतेपदाच्या सामन्यात ब्राझीलचा पराभव केला होता. तर मेस्सीच्या कारकिर्दीतील ही चौथी आंतरराष्ट्रीय ट्रॉफी आहे. कोपा अमेरिकाच्या फायनलमध्येच मेस्सीला दुखापत झाली. त्यामुळे मेस्सी संपूर्ण कोपा अमेरिका फायनल खेळू शकला नाही. सामन्याच्या उत्तरार्धात मेस्सीच्या पायाला दुखापत झाली. घोट्याच्या दुखापतीमुळे मेस्सीला ६६ व्या मिनिटाला मैदान सोडावे लागले. त्याच्या उजव्या पायावर आईस पॅक होता. मैदानाबाहेर गेल्याने मेस्सी रडत होता. आता त्याचा संघ विजेता ठरला आहे. जोवानी लो सेल्सोच्या पासवर मार्टिनेझने गोल केला. हे विजेतेपद सर्वाधिक वेळा जिंकण्याचा विक्रम अर्जेंटिनाने केला आहे. ही स्पर्धा १९१६ मध्ये पहिल्यांदा खेळली गेली होती. ज्याचे आयोजन अर्जेंटिनाने केले होते. उरुग्वे संघाने अंतिम फेरीत यजमान संघाचा पराभव करून पहिले विजेतेपद पटकावले होते. अर्जेंटिनाने १९२१ मध्ये पहिल्यांदा ही ट्रॉफी पटकावली होती.

पीसीबीने दिली बीसीसीआयला धमकी?

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे सामने पाकिस्तानात खेळवले जाणार आहेत. यासाठी पाकिस्तानने वेळापत्रकाचा मसुदाही आयसीसीकडे सादर केला आहे. या मसुदानुसार भारताचे सामने लाहोरमध्ये खेळवले जाणार आहेत. पण एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानात जाणार नाही. हायब्रिड मॉडेलद्वारे भारताचे सामने खेळवले जावे, अशी चर्चा बीसीसीआय आयसीसीबरोबर करणार आहे. पण याच दरम्यान आता पीसीबीने भारताला धमकी दिली आहे. भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानला जाण्यास नकार दिल्यास भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या २०२६ च्या टी-२० विश्वचषकातून बाहेर

पडण्याची धमकी पीसीबीने दिली आहे. जिओ न्यूजच्या वृत्तानुसार, पीसीबी संपूर्ण स्पर्धा पाकिस्तानमध्ये आयोजित करण्यावर ठाम आहे. १९-२२ जुलै दरम्यान कोलंबोमध्ये होणाऱ्या आयसीसीच्या वार्षिक परिषदेदरम्यान कोणत्याही संकरित मॉडेलच्या प्रस्तावाला विरोध करेल.

बीसीसीआय भारतीय संघाला पाकिस्तानात पाठवण्यास टाळाटाळ करत असल्याचा दावा करणाऱ्या भारतीय माध्यमांच्या वृत्ताला उत्तर देताना पीसीबीने ही ठाम भूमिका घेतल्याचे दिसून येते.

खेळाडूंवर बक्षीसांची लयलूट

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

स्पेनचा २१ वर्षीय खेळाडू कार्लोस अल्काराझने विम्बल्डन २०२४ मध्ये ऐतिहासिक विजय नोंदवला. त्याने अंतिम सामन्यात सर्बियनचा दिग्गज नोव्हाक जोकोविचचा पराभव करून सलग दुसऱ्यांदा हे विजेतेपद पटकावले आहे.

विजेतेपदासह कार्लोस अल्काराझवर पैशांचा पाऊस पडला. अल्काराझला बक्षिसाची रक्कम किती मिळाली?

स्पेनच्या २१ वर्षीय कार्लोस अल्काराझने विम्बल्डन २०२४ मध्ये सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले आहे. त्याने अंतिम सामन्यात अनुभवी नोव्हाक जोकोविचचा पराभव करून ही कामगिरी केली. त्याने जोकोविचचा सरळ सेटमध्ये ६-२, ६-२, ७-६ अशा फरकाने धूळ चारली. विम्बल्डन २०२४ पुरुष एकेरी विजेत्या कार्लोस अल्काराझला बक्षीस रक्कम म्हणून ३४,२७,३९६ पौंड (२८ कोटी ३५ लाख रुपये) मिळाले. तर उपविजेता नोव्हाक जोकोविचलाही बक्षीस म्हणून घसघशीत रक्कम मिळाली.

त्याला १४,००,००० पौंड (१४ कोटी ७० लाख रुपये) मिळाले. गेल्या वर्षी विम्बल्डन २०२३ विजेत्या अल्काराझला २५ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम देण्यात आली.

विम्बल्डन २०२४ एकेरी विजेत्या खेळाडूंना मिळालेली बक्षीस रक्कम

- विजेता: २८ कोटी ३५ लाख रुपये
- उपविजेता: १४ कोटी ७० लाख रुपये
- उपांत्य फेरी: ७ कोटी ७५ हजार रुपये
- उपांत्यपूर्व फेरी: ३ कोटी ९३ लाख ७५ हजार रुपये
- चौथी फेरी: २ कोटी ३७ लाख ३० हजार रुपये
- तिसरी फेरी: १ कोटी ५० लाख १५ हजार रुपये
- दुसरी फेरी : ९७ लाख ६५ हजार रुपये
- पहिली फेरी: ६३ लाख रुपये

अल्काराझने विम्बल्डन जेतेपद जिंकले

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

वयाच्या २१ व्या वर्षीच स्पेनच्या कार्लोस अल्काराझने दुसरे विम्बल्डन जेतेपद पटकावताना एकूण चौथे ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावले आहे. सर्वियाचा दिग्गज टेनिसपटू नोव्हाक जोकोविच याचा सरळ तीन सेटमध्ये धुव्वा उडवत अल्काराझने जेतेपदावर नाव कोरले. केवळ २ तास २७ मिनिटांमध्ये बाजी मारताना अल्काराझने जोकोविचला ६-२, ६-२, ७-६ (७-४) असे नमवले. जूनमध्ये उजव्या गुडघ्यावर झालेल्या

■ नोव्हाक जोकोविचचा सरळ तीन सेटमध्ये उडवला धुव्वा

शस्त्रक्रियेमुळे जोकोविचच्या हालचालींवर मर्यादा आल्या होत्या. मात्र, तरीही त्याने झुंजार खेळ करताना विक्रमी ३७ व्यांदा ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली. रविवारी अंतिम सामन्यातही जोकोविच उजव्या गुडघ्यावर पट्टी बांधून खेळला.

त्याच्या मर्यादित हालचालींचा अचूक अंदाज घेत अल्काराझने नेटजवळ अप्रतिम ड्रॉप फटके मारत गुणांची वसुली केली. तसेच, काही वेगवान फोर हँड्सनेही त्याने जोकोला बेजार केले. जोकोला अनेकदा अल्काराझच्या वेगवान फटक्यांना परतावता आले नाही आणि त्यामुळे तो हतबलही झाला. पहिले दोन सेट मोठ्या फरकाने गमावल्यानंतर जोकोने तिसऱ्या सेटमध्ये झुंजार खेळ केला. हा सेट ट्रायब्रेकरमध्ये गेल्यानंतरही जोकोविचने सुरुवातीच्या चार गुणांपर्यंत चांगली झुंज दिली होती. मात्र, त्यानंतर अल्काराझने मिळविलेली पकड सोडली नाही.

अल्काराझने जोकोविचला चुका करण्यास भाग पाडले. कर्करोगावर उपचार घेत असलेली ब्रिटनच्या वेल्सची राजकुमारी केट मिडलटन रविवारी विम्बल्डन टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरीची अंतिम लढत पाहण्यासाठी ऑल इंग्लंड क्लब येथे पोहोचली. तेव्हा चाहत्यांनी उभे राहून राजकुमारीला अभिवादन करत स्वागत केले.

राजकुमारीच्या हस्ते अल्काराझ याला ग्रँडस्लॅम विजेतेपद देण्यात आले. जोकोविचने २०१४ व २०१५ सालानंतर विम्बल्डनमध्ये रॉजर फेडररविरुद्ध अंतिम सामना खेळल्यानंतर पहिल्यांदाच एकाच खेळाडूविरुद्ध सलग दोन विम्बल्डन अंतिम सामने खेळले.

मिन्नू भारतीय महिला क्रिकेट
संघाची कर्णधार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बीसीसीआयने ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारताचा अ संघ जाहीर केला आहे. मजुराची लेक, आदिवासी कुटुंबातून आलेली मिन्नू मणीला या दौऱ्यावर भारतीय संघाची धुरा सांभाळणार आहे.

ट्वेंटी-२०, वन डे आणि एक कसोटी सामना खेळण्यासाठी भारताची युवा ब्रिगेड सज्ज आहे. भारत अ आणि ऑस्ट्रेलिया अ यांच्यात ७ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट या दरम्यान सामने खेळवले जातील. टीम इंडिया तीन ट्वेंटी-२०, तीन वन डे आणि एक कसोटी सामना खेळेल. भारतीय संघ - मिन्नू मणी (कर्णधार), श्वेता सेहरावत (उपकर्णधार), प्रिया पुनिया, शुभ सथीश, तेजल हसबनीस, किरण नवगिरे, संजना सजीवन, उमा चेत्री, शिप्रा गिरी, राघवी बिश्त, सायका इशाक, मन्नत कश्यप, तनुजा कनवर, प्रिया मिश्रा, मेघना सिंग, सायली सातघरे, शबनम शकील, एस यशश्री. राखीव खेळाडू - सायमा ठाकूर. ऑस्ट्रेलिया दौऱ्याचे वेळापत्रक -ट्वेंटी-२० मालिका - ७ ऑगस्ट - पहिला सामना, ९ ऑगस्ट- दुसरा सामना, ११ ऑगस्ट- तिसरा सामना, वन डे मालिका -१४ ऑगस्ट - पहिला सामना, १६ ऑगस्ट- दुसरा सामना, १८ ऑगस्ट-तिसरा सामना तसेच, चार दिवसीय सामना-२२ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट दरम्यान आहे.

महिला प्रीमिअर लीगमुळे महिला क्रिकेटपटूंना एक चांगले व्यासपीठ मिळाले आहे. खरेतर महिला प्रीमिअर लीगच्या लिलावात मिन्नू मणीला ३० लाखांची बोली लागल्यानंतर तिने दिलेल्या प्रतिक्रियेने सर्वांचे लक्ष वेधले होते. मी माझ्या आयुष्यात ३० लाख रुपये कधीच पाहिले नाहीत.

मला आताच्या घडीला कसे वाटते आहे याचे वर्णन करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत, असे मिन्नूने सांगितले होते. मजुराच्या लेकीची गरूडझेप वायनाड ते महिला प्रीमिअर लीग आणि भारतीय संघ हा प्रवास आदिवासी घरातून आलेल्या मिन्नू मणीसाठी सोपा नव्हता.

पॉवर गर्ल अमृता भगतला पॉवरलिफ्टिंगमध्ये सुवर्णपदक
दक्षिण आफ्रिकेत भारताचा डंका

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील शेलू गावातील अमृता भगत या विद्यार्थिनीने पॉवरलिफ्टिंग स्पर्धेमध्ये यशाची शिखरे पादाक्रांत करत थेट जागतिक पॉवरलिफ्टींग स्पर्धेमध्ये मानाचे स्थान मिळवले आहे. नुकत्याच दक्षिण आफ्रिका येथे झालेल्या आशिया पॅसिफिक आफ्रिकन पॉवरलिफ्टिंगव बेंचप्रेस स्पर्धेमध्ये ४७ किलो वजनी गटात सुवर्णपदक कमावले आहे, तर यासह आशियाई सर्वोत्तम लिफ्टर किताब मिळवण्याचा बहुमान देखील तिला मिळाला आहे. अमृताच्या या कामगिरीने कर्जत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

नेरळजवळील शेलूम धील रहिवासी आणि नेरळ ममदापूर येथील मातोश्री सुमती चिंताम णी टिपणीस महाविद्यालयात अमृता ज्ञानेश्वर भगत हिचे शिक्षण सुरु आहे. अमृताला लहानपणापासून क्रीडा क्षेत्राचे खूप आकर्षण होते. माध्यमिक शिक्षण पूर्ण करत असताना तिने कबड्डी खेळात

■ आशियाई सर्वोत्तम लिफ्टर किताबचा देखील बहुमान

परभणी, आंबेजोगाई येथे झालेल्या सामन्यांमध्ये प्राविण्य मिळवले होते. इथूनच तिची क्रीडा क्षेत्रातील भरारी घेण्यास सुरुवात झाली. यानंतर रग्बी खेळात देखील अमृताने यशश्री खेचून आणली होती. पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत अमृताने बाजी मारत गरुड भरारी घेतली ती मागे न वळून पाहण्यासाठीच जिल्हा स्तरावर पॉवरलिफ्टींग-२०२१ ते २०२२ अशी तब्बल चार वेळा सुवर्णपदकं मिळवून स्ट्राँग वुमन ठरली, तर राज्य स्तरावर पॉवरलिफ्टींग, ऑक्टोबर २०२१-रौप्यपदक, मार्च २०२२-दोन सुवर्ण, (ज्युनिअर/सिनिअर), जून २०२२-सुवर्णपदक, जुलै २०२२-सुवर्ण, डिसेंबर २०२२-कांस्यपदक, २०२३-रौप्यपदक, पॉवरलिफ्टींग राष्ट्रीय स्तरावर, एप्रिल २०२२-केरळ येथे रौप्यपदक, ऑक्टोबर २०२२-चंद्रपूर (विदर्भ) येथे रौप्यपदक, मे २०२२ तामिळनाडू येथे कांस्य पदक अशी आजवरची कामगिरी तिने केली आहे. नुकतीच जून २०२३ मध्ये झालेल्या वारसीथ महाराष्ट्र अजिंक्य पद पॉवरलिफ्टिंग स्पर्धेमध्ये अमृताने कांस्य पदक मिळवले होते. तामिळनाडू येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टंग स्पर्धेमध्ये अमृता हिने ४७ किलो वजनी गटता तिसरा क्रमांक पटकावला होता. रोमानिया येथे झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टींग स्पर्धेत तिने रौप्यपदक मिळवले होते. अमृताचे वडील ज्ञानेश्वर भगत हे अमृताच्या मागे ते खंबीरपणे उभे आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)